दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१३२ | शनिवार दि.०१ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये



या दोन्ही महापुरूषांना विनम्र अभिवादन...!

थोडक्यात...

अण्णाभाऊंचे स्मारक संघर्षाचे प्रेरणास्थान–मुख्यमंत्री

मुंबई: लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, विचार आणि सामाजिक कार्य हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण जगाला प्रेरणा देणारे आहे. चिरागनगर या त्यांच्या कर्मभूमीत उभारण्यात येणारे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि स्मारक हे केवळ एक वास्तू नसून वंचित, कष्टकरी आणि उपेक्षित समाजाच्या संघर्षाचे, स्वाभिमानाचे; तसेच सामाजिक परिवर्तनाचे जिवंत प्रतीक ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. चिरागनगर (घाटकोपर) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए), बृहन्मुंबई यांच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या 'लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था' आणि स्मारकाच्या पहिल्या टप्प्याच्या भूमिपूजन समारंभात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदचे उपसभापती सचिन अहिर, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मुंबईच्या महापौर रितू तावडे, खासदार संजय दिना पाटील, आमदार सर्वश्री राम कदम, अमित गोरखे, प्रसाद लाड, अमित साटम, अण्णा भाऊ साठे यांच्या स्नुषा श्रीमती सावित्रीबाई साठे, नात ज्योती साठे, नातू सचिन साठे आदींसह विविध लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

समुद्र मंथन योजनेला केंद्राची मंजुरी

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत समुद्र मंथन मंजूर करण्यात आली. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या या केंद्रीय क्षेत्र योजनेसाठी ८४,०८४ कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली असून, ही योजना २०३०-३१ पर्यंत राबविण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या माहितीनुसार, ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५ च्या स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल किल्ल्यावरून मांडलेल्या आधुनिक समुद्र मंथन संकल्पनेची अंमलबजावणी आहे. या माध्यमातून भारताच्या विस्तीर्ण सागरी क्षेत्रातील तेल आणि नैसर्गिक वायूच्या संभाव्य साठ्यांचा शोध घेण्यावर भर दिला जाणार आहे. या योजनेमुळे देशाची ऊर्जा सुरक्षा अधिक मजबूत होण्यास, देशांतर्गत तेल आणि वायू अन्वेषण व उत्पादनाला गती मिळण्यास, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यास आणि विकसित भारत या संकल्पनेला बळ मिळण्यास मदत होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

भाजपाच्या नेत्याच्या मुलीचा सीजेपीला पाठिंबा

फतेहपूर: 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनांना पाठिंबा देण्यासाठी भाजपच्या अनेक नेत्यांच्या मुली पुढे आल्या आहेत. आता यात यशस्विनी राजेसिंह यांचे नाव जोडले गेले आहे. कंटेंट क्रिएटर असलेल्या यशस्विनी, उत्तर प्रदेशातील फतेहपूर सदरचे माजी आमदार आणि भाजपचे नेते विक्रम सिंह यांची मुलगी आहे. दिल्लीच्या जंतरमंतर येथे कॉकरोच जनता पार्टीच्या विद्यार्थी आंदोलनात सहभागी झालेल्या यशस्विनीने, अल जझीराशी बोलताना, नवीन शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी यांना 'एक निराशाजनक विनोद' म्हटले आहे. मुलाखतीदरम्यान, तिने धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा 'पश्चात्ताप' करणाऱ्या व्यक्तीपेक्षा एका हुतात्म्यासारखा असल्याचे म्हटले. यशस्विनीने राजीनामा पत्रातील शब्द निवडीवरूनही भाजप नेत्यावर टीका केली.

गहू: ३२.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,६०१	२,७३६	२,६६७

ज्वारी/हायब्रिड:३१.०० क्विंटल

२,४७०	२,८००	२,६४२

मका/लोकल: २०.०० क्विंटल

२,३२३	२,३२३	२,३२३

तूर : २.०० क्विंटल

७,६०१	७,६०१	७,६०१

उडीद : २.०० क्विंटल

५,०००	५,०००	५,०००

बाजरी:५२.०० क्विंटल

२,४००	२,८४०	२,६५७

मुग: ४१.५० क्विंटल

५,८००	५,८१२	५,८०६

सोयाबीन:१.५० क्विंटल

६,९००	६,९००	६,९००

हरभरा: १५.५० क्विंटल

५,००१	५,९४०	५,५००

पीएम-किसान योजना २०३१ पर्यंत कायम

पुढील पाच वर्षांसाठी ३.१५ लाख कोटींची तरतूद, ९.५ कोटी शेतकऱ्यांना दिलासा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणारी केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना आणखी पाच वर्षे सुरू ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीसाठी योजनेला मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली. यासाठी केंद्र सरकारने ३.१५ लाख कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली असून, त्यामुळे ही योजना २०३१ पर्यंत सुरू राहणार आहे.




केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर पत्रकार परिषदेत या निर्णयाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पीएम-किसान योजना ही देशातील लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देणारी सर्वात मोठ्या योजनांपैकी एक असून, या योजनेमुळे शेतकऱ्यांना पीक हंगामाच्या सुरुवातीलाच आवश्यक भांडवल उपलब्ध होते. पीएम-किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते. ही रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये प्रत्येकी २ हजार रुपये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. यामुळे बियाणे, खते, कीडनाशके, औषधे आणि इतर कृषी निविष्ठांची खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत मिळते. मध्यस्थांचा हस्तक्षेप टळून निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत असल्याने या योजनेची पारदर्शकताही वाढली आहे. फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत आतापर्यंत २३ हप्त्यांद्वारे एकूण ४.४७ लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. २३ व्या हप्त्यात १८,९८४ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले असून, त्याचा ▶▶ पान २ वर

एल निनो आणखी तीव्र होणार

● केंद्र सरकारची राज्यसभेत माहिती

दिल्ली । वृत्तसंस्था



एल निनोची तीव्रता ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ या कालावधीत आणखी वाढण्याची शक्यता असून, तो अतितीव्र श्रेणीत पोहोचू शकतो, अशी माहिती केंद्र सरकारने राज्यसभेत दिली आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात सांगितले की, विषुववृत्तीय मध्य प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठावरील तापमानातील वाढ याच्या आधारे एल निनोची कमकुवत, मध्यम, तीव्र आणि अतितीव्र अशा श्रेणींमध्ये वर्गवारी केली जाते. डॉ. जितेंद्र सिंह यांनी सांगितले की, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ या कालावधीत एल निनो आणखी तीव्र होण्याची शक्यता असून तो अतितीव्र श्रेणीत पोहोचू शकतो. मात्र, भारतावर त्याचा नेमका ▶▶ पान २ वर

स्व.अजितदादांच्या स्वप्नातील बीड करण्यासाठी साथ द्या-उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या विकासासाठी निधीसह प्रशासन पातळीवरील प्रयत्न कुठेही कमी पडू दिले जाणार नाहीत, अशी ग्वाही देतानाच स्व. अजितदादांच्या स्वप्नातलं बीड आणि त्याचा विकास पूर्ण करण्याचे अभिवचन मी देते, असे राज्याच्या उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. त्याचबरोबर स्व.अजित दादांचे बीड जिल्ह्याच्या विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी मला साथ द्यावी, असे भावनिक आवाहनही त्यांनी यावेळी केले. त्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची सभा दि.३१ शुक्रवार रोजी पार पडली. यामध्ये २०२६-२७ या वर्षासाठी ६२३ कोटी रूपयांच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली.

जिल्हा नियोजन २०२६-२७ अंतर्गत ६२३ कोटींच्या आराखड्याला मंजुरी



बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन भवन सभागृहात ही सभा झाली. यावेळी पर्यावरण व हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, सतीश चव्हाण, प्रकाश सोळंके, धनंजय मुंडे, संदीप क्षिरसागर, सतीश चव्हाण, विजयसिंह पंडीत, सुरेश धस, विक्रम काळे, नमिता मुंदडा, बसवराज पाटील, सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, जिल्हा नियोजन अधिकारी शीला मिसाळ आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा बनवताना दादांनी दिलेल्या सूचना पुढेही सुरू ठेवाव्यात असे निर्देश देण्यात आले. याबाबतचे सविस्तर सादरीकरण या सभेत झाले. या सूचनांप्रमाणे ▶▶ पान २ वर

जिल्ह्यासाठी ठळक तरतुदी...

पशुसंवर्धन अंतर्गत कृत्रिम रेतनकेंद्र इमारत बांधकाम ५.२७ कोटीची मान्यता. पशुपैदास प्रक्षेत्र साकूड येथे पाणीपुरवठा योजना २.९९ कोटी. १८ पशुवैद्यकीय दवाखाना बांधकाम व दुरूस्ती ४.८९ कोटी. जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन जिल्हा परिषद साठी विशेष निधी. २०२५-२६ मध्ये वन विभागामार्फत ४७५.४ हेक्टर क्षेत्रावर वृक्षलागवड झाली. येत्या काळात आणखी २६३.३० हेक्टर वर वृक्षलागवडीचे उद्दिष्ट. हरित बीड वृक्ष लागवड अंतर्गत यंदा ६५ लाख ४९ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट. ग्रामपंचायत जनसुविधेसाठी ३७.५३ कोटी विशेष अनुदान यात प्रामुख्याने ९१ ठिकाणी स्मशानभूमी शेड बांधकाम आणि ग्रामपंचायत इमारत बांधकाम. उर्जा विकास अंतर्गत विविध ६१ कार्यालयात अपारंपारिक ऊर्जा साधन विकास अंतर्गत १२ कोटी मंजूर बीड जिल्हा ग्रंथालय इमारत बांधकाम २ कोटीची मान्यता एकूण आराखडा ४.९५ कोटी रूपयांचा कंकालेश्वर मंदिर विकासासाठी ११.२१ कोटींची तरतूद.

बीडमध्ये एकीकडे पालकमंत्र्यांचा दौरा तर दुसरीकडे ४५ लाखाची लाच घेताना अधिकारी पकडला!

५ लाखांच्या खऱ्या तर ४० लाखांच्या खेळणीतील नोटा जप्त!

बीड । प्रतिनिधी



वृक्ष लागवड निधी वितरीत करण्यासाठी १२ टक्के प्रमाणे कमिशन मागणे, निलंबनाचा प्रस्ताव पाठपुरावा न करणे, प्रलंबित दोन वेतनवाढ मंजूर करणे व नर्सरी कामाची चौकशी न करण्यासाठी तब्बल ४५ लाख रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या सामाजिक वनीकरण विभाग, बीडचे विभागीय वन अधिकारी (वर्ग-१) श्री. श्रीनिवास लिंगन्ना लखमावाड यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगरच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. विशेष म्हणजे, या लाचेच्या रकमेत ५ लाख रुपये खऱ्या चलनी नोटा आणि उर्वरित ४० लाख रुपये खेळणीतील (डमी) नोटांचा वापर केल्याचे उघडकीस आल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार जिल्ह्याच्या दौऱ्यावर होत्या. ▶▶ पान २ वर

संसद परिसरात राम मंदिरातील चोरीवर अनोखे आंदोलन!

राहुल गांधींनी दान केले पैसे,व्हिडिओ व्हायरल

दिल्ली । वृत्तसंस्था



राम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहाराच्या मुद्द्यावरून संसदेच्या पावसाळी अधिवेशनात शुक्रवारी विरोधकांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. समाजवादी पक्ष, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात निदर्शने करत या प्रकरणावर चर्चेची मागणी केली. या आंदोलनात अपक्ष खासदार पप्पू यादव पुजाऱ्याच्या वेशात सहभागी झाले, तर राहुल गांधी आणि डिंपल यादव यांनीही सहभाग घेतला.

बिहारमधील पूर्णिया मतदारसंघाचे अपक्ष खासदार राजेश रंजन उर्फ पप्पू यादव हे पुजाऱ्याच्या वेशात संसद भवनातील मकर द्वाराजवळ पोहोचले. ▶▶ पान २ वर

ई-२० पेट्रोलमुळे वाहनांचे नुकसानच!

● केंद्र सरकारची पहिल्यांदाच कबुली



दिल्ली । वृत्तसंस्था

ई-२० पेट्रोल (पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळून बनवलेले पेट्रोल) वापरल्याने वाहनांचे नुकसान होऊ शकते. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. त्यामुळे सरकारने प्रथमच कबुली दिली आहे.

गडकरी यांनी सांगितले की, ई-२० मुळे काही जुन्या बीएस-३ वाहनांमधील विशिष्ट रबरचे ▶▶ पान २ वर

कॉकरोच जनता पार्टी राजकिय दबाव गट म्हणून काम करेल!

सीजेपीचे अभिजीत दीपके यांची स्पष्टोक्ती



संभाजीनगर । प्रतिनिधी

'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्याशी मतभेद झाल्याच्या चर्चा फेटाळून लावल्या. त्यांनी सांगितले की, हे आंदोलन सोनम वांगचुक यांचे बलिदान कधीही विसरू शकत नाही आणि आपण दोघेही अजूनही एकाच भूमिकेवर ठाम आहोत. विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला; त्यानंतर एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत अभिजीत दिपके यांनी हे भाष्य केले. आंदोलनाचा समारोप करताना सोनम वांगचुक यांचा उल्लेख न केल्यामुळे कॉकरोच जनता पार्टी आणि सोनम वांगचुक यांच्यात फूट पडली आहे का, या प्रश्नाला उत्तर देताना अभिजीत दीपके यांनी ही शक्यता फेटाळून लावली.

अभिजीत दीपके म्हणाले की, आम्ही अजूनही एकाच भूमिकेवर ▶▶ पान २ वर

महाराष्ट्रातील रखडलेल्या जिप.पंस. निवडणुका डिसेंबरमध्ये?

मुदत संपलेल्या १०५ नगरपंचायती आणि १२ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकाही होण्याची शक्यता

दिल्ली । वृत्तसंस्था

राज्यातील रखडलेल्या २२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने या निवडणुका घेण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल लवकरच वाजण्याची शक्यता आहे. सध्या सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरावलोकन प्रक्रियेनंतर या निवडणुका डिसेंबर महिन्यात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



राज्यात ओबीसी आरक्षणासह एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची घटनात्मक मर्यादा ओलांडल्यामुळे २२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित राहिल्या होत्या. जानेवारी महिन्यात १२ जिल्हा परिषदांसाठी मतदान झाले; मात्र उर्वरित जिल्ह्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरू होऊ शकली नव्हती. आता सरकारने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा कायम ठेवत निवडणूक घेण्याची तयारी सर्वोच्च न्यायालयात दर्शविल्याने या निवडणुकांबाबत सकारात्मक संकेत मिळत आहेत. ५० टक्क्यांच्या मर्यादेनुसार नव्याने आरक्षण निश्चित करावे लागणार असल्याने अनेक जिल्ह्यांतील आरक्षित जागांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. याचा सर्वाधिक परिणाम ओबीसी आरक्षणावर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नागपूर जिल्हा परिषदेत पूर्वी ३३ जागा आरक्षित होत्या. नव्या आराखड्यानुसार त्या कमी होऊन २७ जागांपर्यंत मर्यादित राहू शकतात. जानेवारीत झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये महायुतीने प्रभावी कामगिरी केली होती. आता ▶▶ पान २ वर

अग्रलेख

तरुणांना अजूनही धर्म आणि राष्ट्रवादाच्या नावावर का विभागले जाते?

भारतातील जेन झी धर्मापासून दूर जात आहे, अशी भीती काही जण व्यक्त करतात. तर काहींना हीच पिढी कट्टर धार्मिक होत असल्याचे चित्र दिसते. परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे. आजचा तरुण धर्म सोडत नाही, तो धर्माचा अर्थ बदलत आहे. तो राष्ट्रवाद नाकारत नाही, तर राष्ट्रवादाची नव्याने व्याख्या करत आहे. प्रश्न इतकाच आहे की, समाज, सरकार, धार्मिक संस्था आणि राजकीय पक्ष या बदलाला समजून घेण्यास तयार आहेत का? आज भारतातील तरुणाला मंदिर, मशीद, गुरुद्वारा किंवा चर्चपेक्षा रोजगार, शिक्षण, मानसिक आरोग्य, तंत्रज्ञान, हवामान बदल आणि समान संधी यांचे प्रश्न अधिक अस्वस्थ करतात. तरीही सार्वजनिक चर्चेत त्याला पुन्हा पुन्हा धर्माच्या आणि ओळखीच्या चौकटीतच का अडकवले जाते?

भारतातील कोट्यवधी जेन झी तरुणांमध्ये देवावरील श्रद्धा कायम आहे. अनेक अभ्यास दर्शवतात की तरुण प्रार्थना करतात, ध्यान करतात आणि अध्यात्मातून मानसिक स्थैर्य शोधतात. एका अभ्यासानुसार सुमारे ६२ टक्के भारतीय जेन झी युवकांनी अध्यात्मामुळे मानसिक स्पष्टता आणि भावनिक आधार मिळतो, असे नमूद केले आहे. पण त्याच वेळी ही पिढी धार्मिक संस्थांना प्रश्न विचारते. आणि इथेच संघर्ष सुरू होतो. धर्माला प्रश्न विचारणे म्हणजे धर्मविरोध आहे का? विवेकाची मागणी करणे म्हणजे श्रद्धेचा अपमान आहे का? सामाजिक सुधारणांचा इतिहास पाहिला तर प्रत्येक परिवर्तन प्रश्न विचारणाऱ्यांनीच घडवले आहे. मग आजचा युवक प्रश्न विचारतो तेव्हा त्याला ''संस्कृतीविरोधी'' ठरवण्याची घाई का केली जाते? राजकीय पक्षांची भूमिकाही याहून वेगळी नाही. निवडणुका जवळ आल्या की युवकांना रोजगाराच्या आकडेवारीपेक्षा धार्मिक ध्रुवीकरणाच्या चर्चेत अडकवले जाते. बेरोजगारी, शिक्षणातील असमानता, कौशल्य विकास, महागाई, डिजिटल अर्थव्यवस्था किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बदलणाऱ्या रोजगार बाजारावर ठोस चर्चा कमी; पण धर्माच्या नावावर भावना पेटवण्याची स्पर्धा मात्र कायम. हा योगायोग आहे की ठरवून आखलेले राजकारण? राष्ट्रवादाचाही अर्थ बदलत आहे. आजचा युवक राष्ट्रप्रेमाला घोषणांमध्ये नव्हे, तर संविधानाचा सन्मान, सार्वजनिक संस्थांवरील विश्वास, सामाजिक सलोखा आणि जबाबदार नागरिकत्वात पाहतो. पण दुर्दैवाने सार्वजनिक चर्चेत राष्ट्रवाद अनेकदा मतभेद दडपण्याचे किंवा टीकाकारांना देशविरोधी ठरवण्याचे साधन बनतो. लोकशाहीत सरकारवर प्रश्न विचारणे हे देशविरोधी नसून लोकशाहीचे कर्तव्य आहे, हे आपण विसरत चाललो आहोत का? सोशल मीडियाने या संघर्षाला आणखी गुंतागुंतीचे केले आहे. अल्गोरिदम संतुलित विचारांपेक्षा टोकाचे मत अधिक वेगाने पसरवतात. द्वेष, अफवा आणि धार्मिक ध्रुवीकरणाला लाखो व्ह्यूज मिळतात; पण संवाद, विवेक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला तितकीच जागा मिळते का? युवकांच्या मनावर प्रभाव टाकणाऱ्या या डिजिटल परिसंस्थेची जबाबदारी कोण घेणार? धार्मिक संस्थांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. युवकांना फक्त आज्ञाधारक अनुयायी म्हणून पाहण्याची मानसिकता बदलावी लागेल. त्यांना प्रश्न विचारू द्या, चर्चा करू द्या, मतभेद मांडू द्या. श्रद्धा भीतीवर नव्हे, तर विश्वासावर टिकते. प्रश्नांना बंदी घालणारा धर्म नव्हे, तर संवाद स्वीकारणारा धर्मच पुढील पिढीला आपलासा वाटेल. सरकारनेही तरुणांच्या आकांक्षा ओळखल्या पाहिजेत. धर्म आणि राष्ट्रवाद हे समाजजीवनातील महत्त्वाचे घटक आहेत; परंतु ते रोजगार, शिक्षण, आरोग्य, संशोधन, नवोन्मेष आणि सामाजिक न्याय यांची जागा घेऊ शकत नाहीत. तरुणांना घोषणांपेक्षा संधी हव्या आहेत. त्यांना भावनिक ध्रुवीकरणापेक्षा भविष्याची हमी हवी आहे. जेन झी धर्म नाकारत नाही; ती अंधानुकरण नाकारते. ती राष्ट्रवाद नाकारत नाही; ती द्वेषावर उभा राहिलेला राष्ट्रवाद नाकारते. ती भारतीय परंपरेचा सन्मान करते; पण त्या परंपरेला विवेक, विज्ञान आणि संविधानिक मूल्यांच्या कसोटीवरही पाहते. ही पिढी प्रश्न विचारते, कारण तिला उत्तरांची अपेक्षा आहेशत्रू निर्माण करण्याची नाही.

आज सर्वात मोठा प्रश्न असा आहे की भारताला विचार करणारे नागरिक हवे आहेत की फक्त घोषणा देणारे अनुयायी? कारण मजबूत राष्ट्राची निर्मिती धर्माच्या नावावर समाज विभागून होत नाही; ती समान संधी, न्याय, वैज्ञानिक दृष्टी, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्यांवर उभी राहते. जर राजकारण, धार्मिक संस्था आणि शासन यांनी हा संदेश वेळेत समजून घेतला नाही, तर त्यांना नाकारेलच असे नाही; पण त्यांच्यापासून शांतपणे दूर जाईल. आणि हा बदल कोणत्याही निवडणुकीपेक्षा अधिक मोठा सामाजिक बदल ठरेल.

पंच कोणाचा? सरकारचा की संविधानाचा?

सर्वोच्च न्यायालयाचा थेट सवाल!

नवी दिल्ली । वृतसंस्था

देशातील सर्वात महत्त्वाची घटनात्मक संस्था म्हणजे निवडणूक आयोग. निवडणुका निष्पक्ष झाल्या, तर लोकशाही मजबूत राहते; पण निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवरच प्रश्न उपस्थित झाले, तर लोकशाहीचा पाया हादरतो. आता हा प्रश्न विरोधकांनी नव्हे, तर थेट सर्वोच्च न्य३ायालयाने उपस्थित केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी केंद्र सरकारने २०२३ मध्ये केलेला कायदा खरोखरच आयोगाला स्वतंत्र ठेवतो का? की सरकारलाच आपल्या पसंतीचे आयुक्त निवडण्याचा मार्ग मोकळा करून देतो? याच मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान केंद्र सरकारला कठोर प्रश्न विचारले. या प्रकरणामागे अनेक वर्षांची पार्श्वभूमी आहे.

२०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने ऐतिहासिक निर्णय देत सांगितले होते की, संसदेने कायदा करेपर्यंत मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांच्या समितीने करावी. या निर्णयामागील उद्देश स्पष्ट होतासरकारचा एकतर्फी प्रभाव कमी करणे. मात्र त्यानंतर केंद्र सरकारने मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवा अटी आणि कार्यकाळ) अधिनियम, २०२३ आणला. या कायद्यानुसार समितीतून सरन्यायाधीशांना वगळून त्यांच्या जागी केंद्रीय मंत्रिमंडळातील एका मंत्र्याचा समावेश करण्यात आला. परिणामी निवड समितीत पंतप्रधान + केंद्रीय मंत्री असे सरकारचे दोन सदस्य आणि फक्त एक विरोधी पक्षनेता अशी रचना झाली. टीकाकारांच्या मते, अशा परिस्थितीत सरकारचे मत सहज बहुमताने लागू शकते. निवडणूक आयोगावर यापूर्वीही अनेकदा निष्पक्षतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. विरोधकांनी अनेक निवडणुकांमध्ये आचारसंहितेच्या अंमलबजावणीतील दुहेरी निकष असल्याचा आरोप केला.काही प्रकरणांमध्ये तक्रारींवर उशिरा कारवाई, तर काहींमध्ये त्वरित निर्णय झाल्याने आयोगाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले. महाराष्ट्र, दिल्ली, पश्चिम बंगाल, कर्नाटक यांसारख्या राज्यांतील निवडणुकांदरम्यान आयोगाच्या निर्णयांवर राजकीय वाद निर्माण झाले. विशेषतः निवडणूक कार्यक्रम, प्रचारातील कथित उल्लंघने आणि तक्रारींच्या निकाली विलंब यांवरून आयोगाच्या स्वायत्ततेबाबत चर्चा रंगल्या. हे आरोप सिद्ध झालेले नाहीत, परंतु अशा आरोपांमुळे आयोगावरील सार्वजनिक विश्वासाचा प्रश्न वारंवार ऐरणीवर आला आहे.सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट संकेत दिले की, निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेची नियुक्ती प्रक्रिया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक असणे अत्यावश्यक आहे. जर नियुक्ती प्रक्रियेत सरकारचेच स्पष्ट बहुमत असेल, तर स्वायत्ततेबाबत नागरिकांच्या मनात शंका निर्माण होऊ शकते. लोकशाहीत केवळ निष्पक्षता पुरेशी नसते; निष्पक्षता दिसलीही पाहिजे, हा न्यायशास्त्रातील मूलभूत सिद्धांत न्यायालयाने अधोरेखित केला. केंद्र सरकारचे म्हणणे आहे की, नियुक्तीची प्रक्रिया संसदेने कायद्याद्वारे निश्चित केली असून ती संविधानाच्या चौकटीत आहे. सरकारच्या मते, निवड समितीची रचना हा विधिमंडळाचा धोरणात्मक निर्णय आहे आणि त्यात न्यायालयाने हस्तक्षेप करू नये. प्रश्न केवळ एका कायद्याचा नाही, तर मतदाराच्या विश्वासाचा आहे. जर निवडणूक आयोगाच्या नियुक्तीवरच संशय निर्माण झाला, तर निवडणुकीच्या निकालावरही प्रश्न उपस्थित होऊ शकतात. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयासमोरचा हा खटला केवळ कायदेशीर नाही, तर भारतीय लोकशाहीच्या विश्वासार्हतेची कसोटी मानला जात आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्य, शाहिरी आणि सामाजिक समतेचा अखंड लढा

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक , साहित्यिक आणि सामाजिक इतिहासात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे . समाजातील उपेक्षित , शोषित आणि कष्टकरी घटकांचे दु:ख आपल्या लेखणीतून आणि शाहिरीतून जगासमोर मांडणारे अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते , तर ते जनतेचे कवी , समाजप्रबोधनकार आणि परिवर्तनाचे योद्धे होते . त्यांच्या साहित्याने लाखो सामान्य माणसांना आत्मविश्वास दिला आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली . म्हणूनच महाराष्ट्रात १ ऑगस्ट हा दिवस त्यांच्या जयंतीनिमित्त मोठ्या उत्साहात साजरा केला जातो .



१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे त्यांचा जन्म झाला . त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे असे होते . अत्यंत गरिबी , दारिद्र्य आणि सामाजिक विषमता यामध्ये त्यांचे बालपण गेले . लहान वयातच कुटुंबासह ते मुंबईत आले . उदरनिर्वाहासाठी त्यांनी मजुरी , हमाली , बांधकामावरील कामे अशा अनेक कष्टप्रद कामांत हातभार लावला . शिक्षणाची संधी मर्यादित असली तरी जीवनाच्या विद्यापीठातून त्यांनी समाजाचे वास्तव जवळून अनुभवले . हाच अनुभव त्यांच्या साहित्याचा पाया ठरला.

मुंबईतील गिरणगाव , झोपडपट्ट्या आणि कामगार वस्त्यांतील जीवन त्यांनी जवळून पाहिले . श्रमिकांचे प्रश्न , अन्याय , गरिबी , उपासमार आणि विषमता यामुळे त्यांचे मन अस्वस्थ झाले . त्यांनी लेखणी आणि शाहिरीच्या माध्यमातून या प्रश्नांना वाचा फोडण्याचा निर्धार केला . त्यांची भाषा ही लोकभाषा होती . त्यामुळे त्यांचे साहित्य थेट जनतेच्या मनाला भिडले . अण्णाभाऊ साठे यांनी लोककलेचा प्रभावी वापर करून समाजजागृती केली . पोवाडे , लावण्या , वगनाट्ये , लोकनाट्ये आणि शाहिरी यांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक समता , श्रमिकांचे हक्क , राष्ट्रीय एकात्मता आणि स्वाभिमानाचा संदेश दिला . त्यांच्या कार्यक्रमांना प्रचंड प्रतिसाद मिळत असे . ते व्यासपीठावर उभे राहिले की हजारो श्रोते मंत्रमुग्ध होत असत . भारतीय स्वातंत्र्यलढा आणि कामगार चळवळीशी त्यांचा जवळचा संबंध होता . त्यांनी श्रमिकांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठविला . समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळावा , प्रत्येक माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा आणि जात , धर्म , भाषा यापलीकडे मानवतेचा विचार रुजावा , ही त्यांची भूमिका होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही अण्णाभाऊ साठे यांनी मोठे योगदान दिले . मराठी अस्मिता जागविण्यासाठी त्यांनी असंख्य शाहिरी कार्यक्रम केले . त्यांच्या पोवाड्यांनी आणि गीतांनी महाराष्ट्राच्या निर्मितीच्या चळवळीला नवे बळ दिले . जनतेला प्रेरणा देणारा त्यांचा बुलंद आवाज महाराष्ट्राच्या इतिहासात आजही जिवंत आहे . अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य अत्यंत विपुल आहे . त्यांनी ३५ हून अधिक कादंबऱ्या , २० पेक्षा अधिक कथासंग्रह , अनेक लोकनाट्ये , पोवाडे , लावण्या , प्रवासवर्णने आणि शाहिरी साहित्य निर्माण केले . त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू नेहमी सामान्य माणूस होता . त्यांनी कधीही राजदरबारातील किंवा श्रीमंतांच्या जीवनाचे चित्रण केले नाही . त्यांच्या लेखणीत झोपडपट्टी , शेतमजूर , हमाल , कष्टकरी , भटके , वंचित आणि दलित समाज जगत होता. त्यांच्या साहित्यकृतींपैकी ' फकिरा ' ही कादंबरी मराठी साहित्यातील अजरामर कलाकृती मानली जाते . अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या एका सामान्य माणसाची संघर्षगाथा त्यांनी या कादंबरीत प्रभावीपणे मांडली आहे . या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार मिळाला . आजही ती मराठी साहित्यातील अत्यंत महत्त्वाची कादंबरी म्हणून अभ्यासली जाते . अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याला केवळ महाराष्ट्रातच नव्हे , तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही मान्यता मिळाली . त्यांनी सोव्हिएत संघाचा दौरा केला . त्यांच्या साहित्याचे अनेक विदेशी भाषांमध्ये भाषांतर झाले . भारतीय लोकसाहित्य आणि श्रमिक जीवनाचे वास्तव जगासमोर मांडणाऱ्या लेखकांमध्ये त्यांचा उल्लेख आदराने केला जातो. त्यांचे एक प्रसिद्ध वाक्य आजही समाजाला दिशा देणारे आहे '' ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नव्हे , तर कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे . '' या एका वाक्यात त्यांनी श्रमाचे महत्त्व अधोरेखित केले . कोणताही समाज , कोणतेही राष्ट्र किंवा कोणतीही अर्थव्यवस्था कष्टकरी वर्गाशिवाय उभी राहू शकत नाही , हा संदेश त्यांनी दिला . अण्णाभाऊ साठे हे समतेचे पुरस्कर्ते होते . समाजातील भेदभाव , जातीय विषमता आणि अन्यायाविरुद्ध त्यांनी सातत्याने लेखणी चालविली . त्यांनी मानवतेला सर्वोच्च स्थान दिले . त्यांच्या साहित्यामध्ये आशावाद , संघर्ष आणि परिवर्तनाचा संदेश आहे . त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन वाटते. १८ जुलै १९६९ रोजी अण्णाभाऊ साठे यांचे निधन झाले . मात्र त्यांचे साहित्य , त्यांची शाहिरी आणि त्यांचे विचार आजही लाखो युवकांना प्रेरणा देत आहेत . महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठे , संशोधन संस्था आणि साहित्य अभ्यासक त्यांच्या साहित्याचा अभ्यास करीत आहेत . त्यांच्या नावाने विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात . आजच्या काळात सामाजिक समता , संविधानिक मूल्ये , श्रमाचा सन्मान आणि सर्वसमावेशक विकास यांची चर्चा होत असताना अण्णाभाऊ साठे यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात . त्यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला , कष्टाला प्रतिष्ठा दिली आणि साहित्याला समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनविले . म्हणूनच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ एका समाजाचे नव्हे , तर संपूर्ण महाराष्ट्राचे आणि भारताचे प्रेरणास्थान आहेत.

चंद्रकांत सरस्वती
प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

पान १ वरून...

एल निनो आणखी तीव्र होणार

परिणाम किती होईल, हे समुद्र आणि वातावरणातील परस्परसंलग्न प्रक्रियांच्या निर्मितीवर अवलंबून असेल. एल निनो हा त्यातील एक महत्त्वाचा घटक असला तरी तो एकमेव घटक नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. भारतीय हवामान विभागाने २०२६ च्या मॉन्सून हंगामात एल निनो विकसित होण्याचा अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार जून २०२६ मध्ये एल निनो कमकुवत अवस्थेत होता, तर जुलैमध्ये त्याची तीव्रता वाढून तो मध्यम श्रेणीत पोहोचला आहे. तसेच भारतीय हवामान विभाग एल निनोसह इतर हवामान नियंत्रक घटकांवर सातत्याने लक्ष ठेवत असून, हंगामी, मासिक आणि विस्तारित कालावधीचे हवामान अंदाज तसेच आवश्यक सल्ले केंद्र व राज्य सरकारांना नियमितपणे देत असल्याचेही सिंह यांनी स्पष्ट केले.

पीएम-किसान योजना

लाभ ९.४९ कोटी शेतकऱ्यांना झाला आहे. देशातील सर्व राज्यांमधील पात्र शेतकरी या योजनेचा लाभ घेत आहेत. पीएम-किसान योजनेत महिला शेतकऱ्यांचा सहभाग सातत्याने वाढत आहे. सरकारच्या माहितीनुसार, आतापर्यंत महिला शेतकऱ्यांच्या खात्यात १.०६ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा करण्यात आली आहे. पात्र लाभार्थ्यांपैकी जवळपास प्रत्येक चौथी लाभार्थी महिला शेतकरी आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणालाही या योजनेमुळे चालना मिळाल्याचे सरकारचे म्हणणे आहे. पीक उत्पादनाचा वाढता खर्च, हवामानातील अनिश्चितता आणि शेतीतील जोखीम लक्षात घेता, पीएम-किसान योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा आर्थिक आधार ठरत आहे. पीक हंगामाच्या सुरुवातीला मिळणारी मदत बियाणे, खते व इतर खर्च भागविण्यास उपयोगी पडत असल्याने अनेक शेतकऱ्यांना सावकारांकडून कर्ज घेण्याची गरज कमी होते. त्यामुळे ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी देणारी मानली जाते.

स्व.अजितदादांच्या स्वप्नातील बीड

कोणतेही काम १५ लाख रूपयांपेक्षा कमी असता कामा नये. एकाच कामाचे तुकडे करून स्वतंत्र अंदाजपत्रके दिल्यास त्याला मान्यता प्रदान केली जाणार नाही. ही एक महत्त्वाची सूचना आहे. जिल्हा नियोजनात जिल्हा परिषद आणि इतर यंत्रणांना जो निधी दिला जातो त्याचा योग्य प्रकारे विनियोग करून लोकांच्या विकासासाठी प्रयत्न असावेत. असेही सांगण्यात आले आहे. विकासकामात पारदर्शकता व आर्थिक शिस्त महत्त्वाची आहे. तसेच नियोजन करताना ही कामे प्रशासनाची गरज आणि लोकप्रतिनिधींची मागणी याचा समन्वय राखणारी असावी, अशा सूचना श्रीमती पवार यांनी या बैठकीत दिल्या. सभेत सुरुवातीला पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती २०२६ स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेला लोगो आणि शुभंकरचे अनावरण करण्यात आले. तसेच त्यांनी स्पर्धेच्या पुर्व तयारीचा आढावाही यावेळी घेतला. श्रीमती पवार म्हणाल्या की, बीड जिल्ह्याला वारकऱ्यांचा वारसा आहे. जिल्हा बीडच्या विकासासाठी दादांनी केलेले नियोजन सर्व लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या विचारातून, भुमिकेतून दिसून आले आहे. सर्व लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदार संघात आवश्यक कामांसाठी केलेल्या निधी तरतूदीचा जिल्हाधिकारी यांनी नियोजनात समावेश करावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच आमदार धनंजय मुंडे, सुरेश धस यांच्यासह व इतर लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या व ऊसतोड कामगार महामंडळाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले. त्याबाबत मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच लोकप्रतिनिधींच्या इतर सर्व सुचनांवर संबंधित विभागाच्या मंत्र्यांसह बैठक घेऊन प्रश्न सोडविले जाणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. त्याचबरोबर आपले घर, समाज आणि आपल्या जिल्ह्याचा अभिमान राखला जाईल यासाठी सर्वांनी दक्षता घेण्याचे, आवाहनही त्यांनी यावेळी केले. आमदार धनंजय मुंडे यांनी मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठीचा निधी, ग्रामीण विकास निधी, रस्ते विकास, परळी तालूक्यातील धर्मापूरी येथील पुरातन मंदिर विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधीची तरतूद करण्याची मागणी केली. मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची काम करण्याची पध्दत स्व. दादाप्रमाणेच आहे. बीड ऊसतोड कामगार कष्टकरी, वारकरी लोकांचा जिल्हा आहे. जिल्ह्याच्या सर्व लोकप्रतिनिधींनी येथील शाळा, स्मशानभूमी रस्ते, यासारख्या मुलभूत, पायाभूत सुविधांचा विकास करण्याचा प्रयत्न करावा. लोकप्रतिनिधी सोबतच प्रशासनानेही जनताभिमूख राहून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करावा, असेही त्या यावेळी म्हणाल्या. यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील रस्त्यांच्या जोडणी, दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देणे, पाणी पुरवठा योजनेच्या कामात बोगस रक्कम उचलण्यावर सबंधितांवर कारवाईची मागणी केली. एमएसीबी लाईनमुळे मृत्यू झालेल्यांना मदत देणे, शेतकऱ्यांना पीक कर्जात सवलतीच्या दरात ३ लाखांवरुन ७ लाखांपर्यंत मर्यादा वाढविण्याची विनंती केली. त्याचबरोबर तलाठी, ग्रामसेवकांनी गावात राहणे, ऊसतोड कामगारांच्या समस्या घरकुल लाभार्थी यांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. आ. विक्रम काळे यांनी, पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या कार्यपध्दतीला खंबीर पाठिंबा असल्याचे सांगत ४३५ गावातील प्रत्येक मतदार संघात स्मशानभूमी झाली पाहिजे त्यासाठी जागेची तरतूद करावी, अशी सूचना केली. आ.नमिता मुंदडा, शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी भरणे सुलभीकरण, डिपीडिसीमधून सर्व रुग्णालयासाठी औषध खरेदीसाठी आधिकची मागणी केली. तसेच मागील वर्षीचा थकित निधी मिळावा मुलींना कॅन्सर रोखण्यासाठी देण्यात येणाऱ्या लसींबाबत जाणिव जागृती करण्यात यावी, अशी सूचना मांडली. आ.विजयसिंह पंडित यांनी मागील वर्षीच्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी तरतूद करणे तसेच संबंधित विभागात हातपंप दुरुस्ती होण्यासाठी रिक्त जागा तातडीने भरण्याची सूचना केली. आ.प्रकाश सोळंके यांनी ग्रामीण भागातील रस्त्यांवरील पुलांची दयनीय अवस्था, धारूर साठी सीसीटीव्ही उपलब्धतेसाठी निधी, जिल्ह्यात विविध उद्योग आणण्यासाठी तसेच सीएसआर फंड मिळण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना केली. आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्ह्यात मराठा भवन उभारणे तसेच मुलींसाठी वसतीगृह उभारण्यासाठी तरतुद करण्याची सूचना केली. आ.सुरेश धस जिल्ह्यातील दुध उत्पादक, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता कुकुटपालन निधी यासारख्या विविध विशेष घटक योजना अंतर्गत निधीच्या प्रस्तावांकडे लक्ष देण्याची सूचना केली.

संसद परिसरात राम मंदिरातील चोरीवर

त्यांच्या शेजारी समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांनी एक दानपेटी ठेवली. काही वेळानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्या दानपेटीत प्रतीकात्मक स्वरूपात पैसे टाकले. त्यांच्यासह इतर अनेक विरोधी खासदारांनीही दानपेटीत पैसे जमा केले. या आंदोलनादरम्यान पप्पू यादव यांनी दानपेटीत जमा झालेले पैसे पुन्हा स्वतःच्या खिशात टाकले. विरोधकांच्या म्हणण्यानुसार, हा प्रकार राम मंदिरातील कथित देणगी चोरीच्या आरोपांचे प्रतीकात्मक सादरीकरण होता. यानंतर काही विरोधी खासदारांनी ''चोर-चोर'' आणि ''चंदा चोर'' अशा घोषणा देत आंदोलन अधिक तीव्र केले. विरोधकांनी या आंदोलनाच्या माध्यमातून संसदेत राम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहारावर चर्चा घ्यावी आणि दोषींवर ३कारवाई करावी, अशी मागणी केली. फैजाबादचे समाजवादी पक्षाचे खासदार अवधेश प्रसाद यांनी सांगितले की, हा मुद्दा आता संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे. अयोध्येच्या जनतेने दिलेल्या जबाबदारीनुसार हा प्रश्न संसदेत ठामपणे मांडला जाईल, असे त्यांनी म्हटले. समाजवादी पक्षाचे खासदार धर्मेंद्र यादव यांनी राम मंदिरातील देणगी व्यवस्थापनावर गंभीर आरोप केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, मंदिरात देणगी देणाऱ्या अनेक भाविकांना पावत्या देण्यात आल्या नाहीत. तसेच, दानपेटीपर्यंत पोहोचण्यापूर्वीच काही ठिकाणी पैसे घेतले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. याशिवाय, पैशांची मोजणी होत असलेल्या ठिकाणच्या मध्ये अनेक संशयास्पद घटना रेकॉर्ड झाल्या होत्या, मात्र नंतर जुने फुटेज हटवण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. धर्मेंद्र यादव यांनी आरोप केला की, राम मंदिरासाठी जमा झालेल्या निधीचा गैरवापर झाला असून हा पैसा भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषदेशी संबंधित लोकांकडे गेला, असा दावा त्यांनी केला. दरम्यान, या आरोपांवर भाजप किंवा संबंधित संस्थांकडून या वृत्तानुसार अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. दरम्यान, विरोधकांनी राम मंदिरातील कथित देणगी प्रकरणाबरोबरच दिल्लीतील आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईचाही मुद्दा उपस्थित केला आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी करत घोषणाबाजी केली.

बीडमध्ये एकीकडे पालकमंत्र्यांचा

सर्व प्रशासन त्यांच्या दौऱ्यामध्ये व्यस्त असतात. दुसरीकडे मात्र वर्ग एकचा अधिकारी लाच घेताना पकडल्याची खळबळ घटना घडली गेली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे स्वतः वन परिक्षेत्र अधिकारी असून त्यांनी २९ जुलै २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली होती. आरोपी अधिकारी श्रीनिवास लखमावाड (वय ४०, रा. नगर नाका, बीड) यांनी तक्रारदाराकडे विविध प्रशासकीय कामांमध्ये सहकार्य करण्यासाठी ४५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने २९ जुलै रोजी पडताळणी करण्यात आली असता, लोकसेवकाने राहत्या घरी वरील सर्व कामांसाठी ४५ लाख रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार शुक्रवारी (दि. ३१) सापळा रचण्यात आला. आरोपी अधिकाऱ्याने ४५ लाख रुपयांची लाच स्वीकारताना (ज्यात ५ लाख खऱ्या व ४० लाख खेळणीतील नोटा होत्या) रंगेहात ताब्यात घेण्यात आले. सदर धडक कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार-कांगणे, अपर पोलीस अधीक्षक शशीकांत सिंगारे, प्रभारी पोलीस उपअधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर नवले, पोलीस उपअधीक्षक बाळासाहेब शिंदे आणि पथकातील अंमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली. शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

कॉकरोच जनता पार्टी राजकिय दबाव

आहोत. मी त्यांच्याशी फोनवर बोललो आहे. त्यांनी विद्यार्थ्यांचे आभार मानले कारण २० जुलैनंतर हे आंदोलन देशातील तरुणांचे बनले होते आणि आंदोलनादरम्यान त्यांना पोलिसांच्या कारवाईचा सामना करावा लागला होता. त्याच वेळी, त्यांनी या मोहिमेत सोनम वांगचुक यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. पुढे बोलताना अभिजीत दीपके म्हणाले, सोनम वांगचुक सर यांनी दिलेले बलिदान आपण विसरू शकत नाही. त्यांनी स्वतःच्या जीवाची बाजी लावली. २६ दिवस ते उपोषणावर होते. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी देशाला जागृत केले. स्वतःच्या जीवाची बाजी लावून त्यांनी सरकारला जाब विचारण्यासाठी देशाला रस्त्यावर आणले. आणि त्यांच्या उपोषणाशिवाय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा शक्य झाला नसता, असेही सांगितले. मी त्यांना वैयक्तिकरित्या उपोषण सोडण्याची विनंती करत होतो. मी त्यांना म्हणत होतो, 'सर, कृपया तुम्ही तुमचे उपोषण सोडा. आम्ही आमचे आंदोलन सुरू ठेवू.' ज्या दिवशी त्यांनी उपोषण सोडले, त्या दिवशी मला खूप दिलासा मिळाला, असेही यावेळी दिपके यांनी सांगितले. भाजपा नेते जे.पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडल्यामुळे त्यांना निराशा झाली का, असे विचारले असता, अभिजीत दीपके म्हणाले की, ते सोनम वांगचुक यांच्यावर नाराज नाहीत. मला त्या गोष्टीमुळे निराशा झाली नाही. मला निराशा या गोष्टीमुळे झाली की, भाजपचे नेते जे.पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांना त्यांना भेटण्याची परवानगी दिली गेली, पण मला मात्र ती नाकारली गेली. मला त्यांना भेटायचे होते, पण मला भेटू दिले नाही. विरोधी पक्षाचे खासदारही त्यांना भेटण्याचा प्रयत्न करत होते, त्यांनाही भेटू दिले नाही. म३जे.पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांना भेटण्याची परवानगी कशी मिळाली? असा सवालही यावेळी त्यांनी केला. अभिजीत दीपके यांनी आरोप केला की, सोनम वांगचुक यांचे ''सरकारने एक प्रकारे अपहरणच केले होते, कारण त्यांना, विरोधी पक्षाच्या नेत्यांना किंवा 'सीजेपी' च्या सदस्यांना सोनम वांगचुक यांना भेटण्याची परवानगी दिली गेली नाही. तरीही, सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण मागे घेतले याचा आपल्याला आनंद आहे, असे सांगत त्यांनी पुढे नमूद केले की, या देशाच्या भविष्यासाठी त्यांचे जीवन अत्यंत मौल्यवान आहे. अभिजीत दीपके यांनी 'कॉकरोच जनता पार्टी'च्या भविष्यातील वाटचालीबद्दलही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, संघटनेचे महत्त्व वाढत असले तरी तिचे रूपांतर राजकीय पक्षात केले जाणार नाही. ही संघटना निवडणुका लढवण्याऐवजी एक 'राजकीय दबाव गट' म्हणून काम करत राहील, असेही यावेळी स्पष्ट केले. भाजपावरील आपले आरोप पुन्हा एकदा करताना अभिजीत दीपके म्हणाले की, आंदोलनादरम्यान झालेली हिंसा ही चळवळ मोडून काढण्यासाठी ''भाजपाच्या गुंडांनी'' घडवून आणली होती. हे कृत्य भाजपाच्या गुंडांनी केले. मी पहिल्या दिवसापासून सांगत आलो आहे की, भाजपा गोंधळ निर्माण करण्यासाठी आपल्या गुंडांना पाठवेल. त्यांनी अगदी तसेच केले आहे. ज्यांनी हे कृत्य केले, त्यांनीच पोलीस अधिकाऱ्यांनाही लक्ष्य केले, याचे मला दुःख वाटते. ज्या पोलीस अधिकाऱ्यांना अशा प्रकारे लक्ष्य करण्यात आले, त्यांच्याबद्दल आम्हाला सहानुभूती आहे. त्याच वेळी, पोलीस अधिकाऱ्यांकडून ज्या विद्यार्थ्यांची निर्घृणपणे मारहाण झाली, त्यांच्या कुटुंबीयांचे काय? असा सवालही यावेळी केला.

केवळ शिक्षण नाहीतर इतर बाबींवरही लक्ष देणार

अभिजीत दीपके यांनी सांगितले की, कॉकरोच जनता पार्टी भविष्यातील मोहिमा केवळ शिक्षणापुरत्या मर्यादित राहणार नाहीत, तर त्या बेरोजगारी आणि देशातील वाढती आर्थिक दरी या मुद्द्यांवरही लक्ष केंद्रित करतील. तरुणांवर आणि त्यांच्या उपजीविकेवर परिणाम करणाऱ्या मुद्द्यांना अधोरेखित करण्यासोबतच प्रशासनात उत्तरदायित्व आणण्याची या संघटनेची इच्छा असल्याचेही यावेळी सांगितले. राजकीय पक्ष, विविध संस्था आणि तपास यंत्रणांबद्दलचा अविश्वास वाढत चालला आहे. लोकशाही संस्थांवरील लोकांचा विश्वास पुन्हा निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत, नमूद केले की हा अविश्वास लोकशाहीसमोरील एक गंभीर आव्हान आहे.

ई-२० पेट्रोलमुळे वाहनांचे

भाग आणि गॅस्केट बदलण्याची आवश्यकता भासू शकते. ही वाहने प्रामुख्याने २००५ ते २०१६ दरम्यान तयार करण्यात आली होती. हे भाग नियमित सर्व्हिसिंग दरम्यान सहजपणे बदलता येतात. गडकरी यांनी सांगितले की, अभ्यासात असे आढळून आले आहे की ई-२० मुळे वाहनांच्या एकूण कार्यक्षमतेवर किंवा टिकाऊपणावर कोणताही मोठा परिणाम होत नाही. त्यांनी पुढे सांगितले की, या वाहनांच्या इंजिनमध्ये कोणत्याही बदलांची आवश्यकता नाही. गडकरी यांनी असे विधान करण्याची ही पहिलीच वेळ आहे. गडकरी यांनी स्पष्ट केले की, इंडियन ऑइल, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम, सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया यांनी दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी ई-२० इंधनावर एक अभ्यास केला होता. गडकरी यांनी असेही सांगितले की, वाहनाचे मायलेज केवळ इंधनावर अवलंबून नसते, तर त्यावर ड्रायव्हिंगची शैली, रस्त्याची स्थिती, देखभाल आणि इतर घटकांचाही प्रभाव पडतो. याचा वापर जगभरात शंभर वर्षांहून अधिक काळापासून केला जात आहे.

महाराष्ट्रातील रखडलेल्या जिप.पंस.

उर्वरित निवडणुकांमध्ये विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांवर सर्वांचे लक्ष लागले आहे. या भागात काँग्रेसला कामगिरी सुधारण्याची संधी मानली जात आहे. दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकांसोबतच मुदत संपलेल्या १०५ नगरपंचायती आणि सुमारे १२ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकाही एकाच टप्प्यात घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे वर्षअखेरीस राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मोठा राजकीय माहोल निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

या २२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रलंबित

पालघर, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, बीड, जालना, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. ०१ ऑगस्ट २०२६
३

थोडक्यात

गुरुपौर्णिमेनिमित्त संस्कार भारतीतर्फे मान्यवरांचा सपत्नीक सन्मान

माजलगाव । प्रतिनिधी

गुरू म्हणजे जीवनाला योग्य दिशा देणारा आणि अज्ञानाचा अंधार



दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा दीपस्तंभ होय. गुरूच्या ऋणाची परतफेड शब्दांत करणे अशक्य असले तरी कृतज्ञतेच्या भावनेतून संस्कार भारती, माजलगाव यांच्या वतीने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून कला, संस्कृती, अध्यात्म, समाजसेवा आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन सपत्नीक सन्मान करण्यात आला. या आगळ्यावेगळ्या उपक्रमात संस्कार भारतीचे सदस्य तसेच देवगिरी प्रांत अध्यक्ष स्नेहल पाठक यांनी सहभाग घेतला. यावेळी चित्रकला शिक्षक उद्धव विभुते, संघकार्य करणारे जगदीश देशमुख, भारतीय सैन्यात डॉक्टर म्हणून सेवा बजावलेले डॉ.प्रकाश आनंदगावकर, आध्यात्मिक गुरु व भागवताचार्य वे.शा.सं. गोविंदबुवा जोशी आणि सांप्रदायिक परंपरेची धुरा सांभाळणारे ड.श्रीराम देशपांडे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना मान्यवरांनी आपल्या जीवनातील कार्यप्रवास, अनुभव आणि विविध क्षेत्रांतील योगदानाविषयी मनोगत व्यक्त केले. उद्धव विभुते यांनी आपल्या कलाप्रवासातील आठवणी सांगितल्या. जगदीश देशमुख यांनी संघकार्याच्या काळातील अनुभवांना उजाळा दिला. डॉ.प्रकाश आनंदगावकर यांनी भारतीय सैन्यात डॉक्टर म्हणून सेवा बजावताना आलेले अनुभव सांगत राष्ट्रप्रेम आणि निःस्वार्थ सेवेचा आदर्श उपस्थितांसमोर ठेवला. आध्यात्मिक गुरु गोविंदबुवा जोशी यांनी अध्यात्म आणि जीवनमूल्यांवर मार्गदर्शन करत संस्कार व परंपरा जतन करण्याची प्रेरणा दिली. तर ड.श्रीराम देशपांडे यांनी अध्यात्माला सांप्रदायिकतेची जोड देत आपल्या आचार-विचार आणि कर्मातूनच रामाचा शोध घेण्याचा संदेश दिला. गुरुपौर्णिमेनिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून कृतज्ञता, संस्कार, ज्ञान, धैर्य, अध्यात्म आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. मान्यवरांचा सन्मान हा केवळ सत्कार न राहता त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा आणि जीवनमूल्यांची जपणूक करण्याचा भावनिक व प्रेरणादायी सोहळा ठरला.यावेळी संस्कार भारतीय संयोजन समितीचे अध्यक्ष कुणाल कुलकर्णी, सचिव गणेश विभुते, संगिता संदीकर, प्रतिभा ठिगळे, शैलेश पाठक, उषा पंडित, श्रेया ठोंगे यांच्यासह संस्कार भारतीचे सदस्य उपस्थित होते.

देवदहिफळचे माजी सरपंच नरहरी बडे यांचे निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

देवदहिफळचे माजी सरपंच तथा धारूर पंचायत समितीचे माजी उपसभापती नरहरी शहाजी बडे (वय ७७ वर्ष)यांचे शुक्रवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने देवदहिफळसह धारूर तालुक्यावर शोककळा पसरली आहे.



प्रगतिशील शेतकरी, यशस्वी कुक्कुटपालन व्यवसायिक व आदर्श स्वस्त धान्य दुकानदार अशी त्यांची ओळख होती. सरपंचपदाच्या कार्यकाळात त्यांनी गावातील रस्ते, पाणीपुरवठा व इतर विकासकामांना गती दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी इयत्ता पाचवी ते सातवीचे वर्ग गावात सुरू करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचे निष्ठावंत सहकारी म्हणूनही ते परिचित होते. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि जनसेवेमुळे त्यांनी जनमानसात वेगळे स्थान निर्माण केले.त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, दोन सुना, नातवंडे व मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने गावाने विकासाभिमुख, लोकाभिमुख आणि समाजसेवक नेतृत्व गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

विविध फसव्या वित्तीय संस्था विरुद्ध कायदेशीर कारवाईला गती द्यावी -पालकमंत्री सुनेत्रा पवार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी, जिजाऊ माँ साहेब को. ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मातोश्री को. ऑपरेटीव्ह यासारख्या इतरही वित्तीय संस्थांनी जनतेची व ठेवीदारांची आर्थिक फसवणूक केली. याप्रकारची फसवणूक रोखण्यासाठी आणि ठेवीदारांची रक्कम परत मिळवून देण्यासाठी, ठेवीदारांना न्याय देण्यासाठी संबंधित आरोपींवर गुन्हे नोंदविण्यात आले असून दोषींवर कडक कायदेशीर कारवाईला गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज



येथे दिले.

आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयात एमपीआयडी कायदा (चझखऊ -लीं) म्हणजेच 'महाराष्ट्र ठेवीदार (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंध संरक्षण अधिनियम, अंमलबजावणी करण्यासंदर्भात पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी खासदार बजरंग सोनवणे, पर्यावरण व हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षिरसागर, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, आमदार नमिता मुंदडा, पालक सचिव डॉ. राजेश देशमुख, आमदार सुरेश धस, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण फसव्या वित्तीय संस्थांवर जिल्हाधिकारी कार्यालय, बीड आणि विशेष न्यायालयामार्फत जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव करून ठेवीदारांचे पैसे वसूल करण्याची कायदेशीर प्रक्रिया याबाबत करण्यात येत असलेल्या कारवाईचे सादरीकरण केले. यावेळी परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर आणि परिसर विकास आराखड्याची अंमलबजावणी आणि आंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचाही आढावा घेतला.या वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या विकासाचा मास्टर प्लॅन स्व. दादांनी बनविला होता, त्यानुसार विकास सध्या होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे श्रीमती पवार यांनी यावेळी सांगितले.

संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टीत आज भव्य रक्तदान महायज्ञ

आष्टी । प्रतिनिधी

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या लढ्यात आपल्या जीवाची पर्वा न करता सातत्याने संघर्ष करणारे संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार १ ऑगस्ट रोजी आष्टी शहरात सकल मराठा समाज संघटनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजोपयोगी उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याच्या त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत हा रक्तदानाचा महायज्ञ आयोजित करण्यात आल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

मराठा समाजाला न्याय्य आरक्षण मिळावे, समाजाच्या हक्कांसाठी लढा अधिक सक्षम व्हावा आणि सामाजिक बांधिलकी जपली जावी, या उद्देशाने मनोजदादा जरांगे पाटील यांनी नेहमीच समाजाला विधायक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छांपुरते न थांबता गरजू रुग्णांचे प्राण वाचविणाऱ्या रक्तदानासारख्या पवित्र कार्यातून समाजाप्रती



सकल मराठा समाज संघटनेचे आयोजन; समाजहितासाठी मोठ्या संख्येने रक्तदान करण्याचे नागरिकांना आवाहन

आपली जबाबदारी पार पाडण्याचा संकल्प सकल मराठा समाज संघटनेने केला आहे.

रक्ताची गरज भासणाऱ्या अपघातग्रस्त, गंभीर आजारी रुग्ण, माता, बालके तसेच विविध शस्त्रक्रियांसाठी रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा जाणवत असतो. अशा वेळी प्रत्येक रक्तदात्याचे रक्त अनेकांचे जीवन वाचविणारे ठरते. त्यामुळे हे रक्तदान शिबिर केवळ एक सामाजिक उपक्रम नसून मानवतेची सेवा करणारा प्रेरणादायी महायज्ञ असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या रक्तदान शिबिरात आष्टी तालुक्यातील युवक, सकल मराठा समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. युवकांनी समाजहिताचा विचार करून स्वयंस्फूर्तीने रक्तदानासाठी पुढे यावे, असेही आयोजकांनी नमूद केले.

रक्तदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या महायज्ञात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांना कृतीतून वाढदिवसाच्या शुभेच्छा द्याव्यात आणि हा उपक्रम भव्य यशस्वी करावा, असे आवाहन सकल मराठा समाज संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरुन...

माजी आ. भीमराव धोंडे

माजी आ. भीमराव धोंडे यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा,संस्कार आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा क्रीडा महोत्सव विद्यार्थींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे प्रशासन अधिकारी,कडा येथील आनंद शैक्षणिक संकुलातील प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते, प्राचार्य दादासाहेब काळे,प्राचार्य अशोक गदादे, उपप्राचार्य डॉ. संजय धोंडे व उपप्राचार्य प्रोफेसर बापू खैरे क्रीडा शिक्षक,प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी परिश्रम घेत आहेत. स्पर्धांमधील विजेत्या खेळाडूंना सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे.संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि क्रीडाप्रेमींनी या भव्य क्रीडा महोत्सवास उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दिंडीत महिलेच्या गळ्यातील

आरोपींना ताब्यात घेतले:

१. केशरबाई सुखदेव जाधव

२. संगिता विजय गायकवाड (दोन्ही रा. गांधीनगर पेठ, बीड)

पोलिसांनी कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून गुन्ह्यातील १ तोळे २.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत १,१९,९९० रुपये) हस्तगत करण्यात आले आहेत.सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, आणि पोलीस उपअधीक्षक व्यंकटरामन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक शेखर आँटे, तसेच अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, अर्जुन यादव, महिला पोलीस अंमलदार स्वाती मुंढे, मनोज परजणे आणि सिद्धेश्वर मांजरे यांच्या पथकाने पार पाडली आहे.

जीपीएस आणि बनावट

येथील शिवडी तपोवन रोड परिसरातून हस्तगत करण्यात आली.

प्राथमिक तपासात आरोपींनी यापूर्वीही अशाच प्रकारे सदर गाडी नोटरी करून इतर दोन व्यक्तींना विक्री केल्याची माहिती समोर येत आहे. या संपूर्ण रॅकेटमध्ये आणखी किमान तीन आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून, पोलीस त्या दिशेने सखोल तपास करत आहेत.

सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मा. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक मा. समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार, सपोनि समाधान दौड, परिपोउपनि हिमांशु नागरे, पोह/२२३ कल्याण राठोड, पोना/१८५४ अमोल सोनवणे, पोकॉ/२०६८ अश्वीन (विक्की) सुरवसे आणि पोकॉ/२१०४ ऋषिकेश पोटे यांच्या पथकाने पार पाडली.

बीडच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी

करचुंडी येथे आरोग्य उपकेंद्राच्या मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याने तो तातडीने मंजूर करून स्थानिक नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.खटकाळी तलाव बाधित कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करून त्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच कपिलधारवाडी येथील जमिनीला भेगा पडल्यामुळे बाधित झालेल्या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी महसूल प्रशासनाला तातडीने आवश्यक निर्देश देण्याची मागणीही करण्यात आली. या सर्व प्रश्नांवर सकारात्मक निर्णय झाल्यास बीड शहर व तालुक्यातील महिला, शेतकरी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी शिवसंग्राम चे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोणाकडे, नारायणराव काशीद, अनिल घुमरे ,सुहास पाटील, ज्ञानेश्वर कोकाटे पंडितराव माने, मनोज जाधव, मनीषा कूपकर, गणेश मोरे ,गणेश साबळे, शैलेश सुरवसे, पांडुरंग बहिर आदी उपस्थित उपस्थित होते.

आ. सुरेश धस यांचा जिल्हा

चालना देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे, शासकीय इमारतींवर रूफटॉप सौरऊर्जा प्रकल्प राबविणे, वृक्षारोपण मोहिमेतील अनियमिततेची चौकशी करणे तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणावी, अशा मागण्याही त्यांनी बैठकीत मांडल्या. दरम्यान, राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना तसेच १० एचपीपर्यंतच्या कृषीपंपांच्या थकीत वीजबिल माफी या शेतकरी हिताच्या ऐतिहासिक निर्णयांचे स्वागत करत आ. सुरेश धस यांनी राज्य शासनाचे आभार व्यक्त केले.जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची आवश्यकता असून, याबाबत संबंधित विभागांनी सकारात्मक कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही आ. धस यांनी बैठकीत व्यक्त केली.

मोगरा जिल्हा परिषद

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल अधिक प्रेरणा व आपलेपणाची भावना दृढ झाली आहे.या सामाजिक उपक्रमात सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक, शिक्षणप्रेमी नागरिक व दातृत्वशील व्यक्तींचे आभार शाळेचे मुख्याध्यापक सुभाष घनघाव, सहशिक्षक हानुमंत पांढरपोटे यांनी व्यक्त केले तसेच गावातील शिक्षणप्रेमी यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यास नवी दिशा मिळत असल्याची भावना उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केली.

स्पा सेंटर व इतर ठिकाणी सुरु असलेल्या वेश्या व्यवसायावर छापा; ६ पीडित महिलांची सुटका

बीड । प्रतिनिधी

बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चराटा फाटा (तळेगाव) आणि धुळे-सोलापूर बायपास रोडवरील '२४ स्पा मसाज सेंटर' येथे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने धाड टाकून ६ पीडित महिलांची सुटका केली आहे. या धडक कारवाईत ५ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून ५ लाख २१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी बाहेर जिल्ह्यातून व राज्यातून महिलांना बोलावून वेश्या व्यवसाय चालवला जात आहे. वरिष्ठांच्या आदेशानुसार पोलीस पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. चराटा फाटा (तळेगाव): येथील एका ठिकाणी डमी ग्राहक पाठवून खात्री केली असता, महिला एजंट आशा सुनील निंबाळकर हिने वेश्यागमनासाठी होकार दिला. पोलिसांनी छापा टाकला असता तेथे एक पीडित महिला मिळून आली. घरमालकीण सुमन लिंबाजी माने व इतर महिला बाहेरून महिलांना बोलावून हा व्यवसाय चालवत असल्याचे समोर आले. '२४ स्पा मसाज सेंटर' (बहिरवाडी शिवार): धुळे-सोलापूर बायपास रोडवरील अंजली बिअर शॉपी जवळ असलेल्या या स्पा सेंटरमध्ये छापेमारी करून मॅनेजर हरिभाऊ सुनील शेलकर व इतर संशयितांना ताब्यात घेण्यात आले. पश्चिम बंगाल व इतर ठिकाणांहून आणलेल्या ५ पीडित महिलांची येथून सुटका करण्यात आली. कारवाईदरम्यान पोलिसांनी १ चारचाकी कार, ४ मोटरसायकल, २ अँड्रॉइड मोबाईल, ६० निरोध आणि नगदी/ऑनलाइन रक्कम असा एकूण ५,२१,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरोधात बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख, सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटरमण यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. अशोक मुदीराज, सपोनि जनाबाई सांगळे टीमच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

आज श्री स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळवंडी येथे गणवेश वाटप व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

श्री स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय,पिंपळवंडी येथे आज शनिवार दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता संत निवृत्तीनाथ महाराज विश्वस्त मंडळ,पिंपळवंडी व श्री.गंगाभारती महाराज शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी सत्कार व मोफत गणवेश वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज (१००८) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे विद्यमान आ.सुरेश आण्णा धस,उद्योजक परमेश्वर येवले पाटील (इंदौर),भाऊसाहेब आण्णा भवर, माऊली आप्पा जरांगे,जोगदंड सर,ड.साबळे सर,पिंपळवंडीचे सरपंचपती निलेश मोरे तसेच उपसरपंच दादासाहेब पवार यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

विद्यालयातील शैक्षणिक,क्रीडा व विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात येणार असून,विद्यार्थ्यांना गणवेशाचेही वितरण करण्यात येणार आहे.माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त उद्योजक परमेश्वरजी येवले (इंदौर) यांच्या वतीने छत्रीचे वाटप करण्यात येणार आहे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम परिसरातील विद्यार्थी,पालक व नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

तरी परिसरातील सर्व ग्रामस्थ, पालक,माजी विद्यार्थी,शिक्षणप्रेमी तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे,असे आवाहन श्री स्वामी अमृत भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

आज बर्दापूर येथे जेष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर

बर्दापूर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथे वयोवृद्ध नागरिकांच्या आरोग्य तपासणीसाठी शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०० वाजता बर्दापूर येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे आरोग्य शिबिर सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, बीड व एकता बहुद्देशीय महिला मंडळ संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र बर्दापूर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले आहे.

शिबिरामध्ये वयोवृद्ध नागरिकांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखरेची तपासणी, आवश्यक वैद्यकीय सल्ला तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी नागरिकांची तपासणी करून आवश्यक उपचार तसेच पुढील आरोग्य सेवांबाबत मार्गदर्शन करतील.

आयोजकांनी अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर व परिसरातील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी समाजकल्याण विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी-कर्मचारी तसेच एकता बहुद्देशीय महिला मंडळ संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक प्रयत्नशील आहेत.

जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं २१२६/२०२६

ज्ञानेश्वर नागुराव घोडके विरुद्ध-ग्रा. पं. कार्यालय, लोळदगाव/बेलापुरी

पहा १. ज्ञानेश्वर नागुराव घोडके, - रा. लोळदगाव ता.जि.बीड (ह.मु. खराडी, पुणे) उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून ज्ञानेश्वर नागुराव घोडके यांचा दिनांक दिनांक ०५/०३/१९७६ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न प. कार्यालयास लोळदगाव/बेलापुरी -ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे लोळदगाव/बेलापुरी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/८/२०२६ ही आहे.

स्वाक्षरीत /-
तहसीलदार, बीड

जाहिरनामा

मा. श्रीमती एस. डी. सोनी २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड
ता.जि.बीड यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज :- ९५२/२०२६
सोजरबाई हरिदास वाघमारे वि. निरंक
विधीज्ञ नाईकवाडे एस. एस.

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १. सोजरबाई भ्र. हरिदास वाघमारे, वय ५६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. हरिदास वाघमारे १३३ कळसंबर, नेकनूर ता.जि. बीड. २. भाऊसाहेब पि. हरिदास वाघमारे, वय ४४ वर्षे, धंदा-शेती, रा. हरिदास वाघमारे १३३ कळसंबर, नेकनूर ता.जि. बीड. ३. रमाकांत पि. हरिदास वाघमारे, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. हरिदास वाघमारे १३३ कळसंबर, नेकनूर ता.जि. बीड.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे हरिदास शामराव वाघमारे, यांचा दिनांक २२/११/२०२५ रोजी मौजे कळसंबर, ता.जि. बीड, येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार कं २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई, वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत. मयत नामे हरिदास शामराव वाघमारे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांने हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत हरिदास शामराव वाघमारे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख ३१.०८.२०२६ आहे.

आज दिनांक ०९.०७.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

आदेशावरून
स्वाक्षरीत /-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

टी.सी.हरवला आहे

मनीषा गंगाराम गांडगे या नावाचा इयत्ता १२ वी पास चा टीसी वडवणी ते बीड बस प्रवासामध्ये हरवला आहे सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

संपर्क : ९९७०५४८७३७

बळीराजा मोफत वीज योजनेच्या दर सवलतीपोटी 1,437 कोटी निधी मंजूर

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील कृषिपंपधारक शेतकऱ्यांना मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेंतर्गत दिलेल्या वीज दर सवलतीपोटी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला १,४३७.३४ कोटी निधी वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी एकूण १५,७३२.८९ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. यातील निधी टप्प्याटप्प्याने वीज दर सवलतीपोटी वितरित केला जात आहे. याबाबतचा शासन निर्णय उद्योग, ऊर्जा विभागाने जारी केला आहे.

राज्यातील विविध वर्गातील ग्राहकांना शासनाच्या धोरणानुसार वीज वितरण कंपनीला वीज दरात सवलत देण्यात येते. त्याची प्रतिपूर्ती शासनाकडून वीज वितरण कंपनीस केली जाते. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत राज्यातील ७.५ एचपी पर्यंतच्या कृषिपंप ग्राहकांना ५ वर्षासाठी एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत



मोफत वीज देण्यात येत आहे. त्यासाठी प्रतिवर्षी लागणारा निधी अनुदान स्वरूपात महावितरण कंपनीस अदा करण्यात येतो. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी कृषिपंप ग्राहकांना मोफत वीज योजना- वीज दर सवलत योजनेसाठी १५,५५२ कोटी आणि पावसाळी अधिवेशन २०२६-२७ मध्ये पुरवणी मागणीद्वारे १८०.८९ कोटी अशा एकूण १५,७३२.८९ कोटी निधीची तरतूद केली आहे. या तरतुदीपैकी या वर्षात २,६०९.९० कोटी इतका निधी महावितरण कंपनीस वितरीत केला आहे. आता १,४३७.३४ कोटी निधी वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ही रक्कम फक्त कृषिपंप ग्राहकांना वीज दर सवलतीपोटी खर्च होईल याची दक्षता महावितरण कंपनीने घ्यायला हवी. तसेच ज्या उद्देशासाठी सदर निधी मंजूर केला आहे, त्याचसाठी तो उपयोगात आणला जाईल याची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील, असे शासन निर्णयात म्हटले आहे.

हळद पिकावरील कंदमाशी नियंत्रण



कंदमाशी ही हळद पिकावरील नुकसान करणारी प्रमुख कीड आहे. कंदमाशीचा प्रौढ डासासारखा परंतु मुंगळ्याप्रमाणे आकाराने मोठा व काळसर रंगाचा असतो. प्रौढ माशीचे पाय शरीरापेक्षा लांब असतात. पायांची पुढील टोके पांढऱ्या रंगाची असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून, त्यांच्यावर राखाडी रंगाचे दोन ठिपके असतात. ज्या ठिकाणी हळदीचे कंद उघडे पडलेले असतील त्या ठिकाणी जमिनीलगत प्रौढ माशी अंडी देते व अशा अंड्यातून अळ्या बाहेर पडून उघड्या गड्डयामध्ये शिरून त्यांच्यावर उपजीविका करतात. अशा गड्डयामध्ये नंतर बुरशीजन्य रोगांचा आणि काही सुत्रकृमींचा शिरकाव होतो. त्यामध्ये खोड व गुद्दे मऊ होतात व त्यांना पाणी सुटून ते कुजतात. जास्ती दिवस लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक प्रमाणात अनुकूल असतो. वेळीच लक्ष दिले नाही तर या कीडीमुळे हळद पिकामध्ये ४५ ते ५० टक्के नुकसान होते. ही कीड जुलै-ऑगस्ट ते पिकाच्या काढणीपर्यंत नुकसान करते.

व्यवस्थापन :

१५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% टक्के २० मि.ली. किंवा डायमिथोएट ३० टक्के १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे सोबत चांगल्या दर्जाचे स्टिकर मिसळून आलटुन-पालटून फवारावे. उघडे पडेलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी. तसेच जमिनीतून क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन आळवणी करावी. याच पद्धतीने आळवणी एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात एकदा करावी. कंदमाशी मुळे कंद कूज झाली असल्यास मुख्य किटकनाशकासोबत एका बुरशीनाशकाची तज्ञांच्या सल्ल्याने मिसळून आळवणी करावी. त्याचबरोबर एकरी २-३ पसरट तोंडाची भांडी वापरून प्रत्येक भांड्यात एरंडीचे २०० ग्रॅम भरडलेले बी घेऊन त्यात १ ते १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशीचे प्रौढ आकर्षित होतात व त्यात पडून मरतात. हळद पीक काढल्यानंतर शेतात राहिलेल्या पिकांचे अवशेष, सडके कंद जमा करून नष्ट करावेत. अशाप्रकारे कंद माशीच्या प्रादुर्भावास वेळीच लक्ष देऊन व्यवस्थापनविषयी योग्य उपायोजना करून भविष्यात होणारे नुकसान टाळावे

शेळ्या मेंढ्यातील आंत्रविषार; लक्षणे आणि उपचार!

शेळ्या मेंढ्यामध्ये आढळणारा आंत्रविषार हा आजार पावसाळ्यात उगवलेले कोवळे लुसलुशीत गवत भरपूर प्रमाणात खाल्ल्यामुळे या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो. हा आजार सर्व वयोगटातील शेळ्या-मेंढ्यांना होतो. परंतु लहान करडे/कोकरांमध्ये मृत्युदर जास्त दिसून येतो. हा आजार कमी कालावधीचा आहे. प्रादुर्भाव झाल्यापासून दोन ते बारा तासांत मृत्यू होतो. त्यामुळे या आजारावर प्रतिबंधक उपाय करणे फारच गरजेचे आहे.

आंत्रविषार

आजाराची लक्षणे:

शेळ्या-मेंढ्या निस्तेज दिसतात. एका जागेवर बसून राहतात. दूध पीत नाहीत. पातळ हिरव्या रंगाची संडास करतात. तोंडास फेस येतो, फिट येते. बाधित पिल्ले हवेत उडी मारून जमिनीवर पडतात. मान वाकडी होते. त्यांचा मृत्यू होतो. मोठ्या शेळ्या-मेंढ्या तीव्रतेनुसार काही दिवसांपर्यंत आजारी राहतात.



ज्यामध्ये ताप येणे, तोंडातून फेस येणे, अडखळत चालणे, तोल जाणे, गोल फिरणे, चक्कर येणे तसेच श्वसनास त्रास होणे इत्यादी लक्षणे दिसतात. शेवटच्या टप्यात पोटफुगी, जुलाब ही लक्षणे आढळून येतात. पोट फुगल्यामुळे जनावर उठबस करतात. सारखे पाय झाडतात.

आंत्रविषार

आजारावर उपचार :

हा अल्प मुदतीचा आजार असल्यामुळे प्रभावी उपचार करणे शक्य होत नाही. यासाठी अधिक खर्चसुद्धा होतो. पशुवैद्यकाच्या सहाय्याने विशिष्ट प्रतिजैविके दिल्यास पोटातील विष शोषण्याचे प्रमाण कमी होते, जीवाणूंची वाढ थांबते. कळपातील मरतुक कमी होऊ शकते. एखादे लिव्हर टॉनिक व शिरेवाटे ग्लुकोज दिल्यास फायदा होऊ शकतो. प्रथमोपचार म्हणून लहान पिलांना हगवण सुरू झाल्यानंतर मिठाचे पाणी किंवा इलेक्ट्रोलाईट्सचे द्रावण पाजावे. आजारास प्रतिबंध करणे, अत्यंत सोपे, कमी खर्चाचे, व प्रभावी मध्यम आहे. मुख्यता लसीकरण व आहारातील व्यवस्थापन करून या आजाराचा प्रादुर्भाव टाळता येतो.

सोयाबीनची पाने पिवळी पडण्याची कारणे आणि उपाय

यावर्षी अल निनोच्या पार्श्वभूमीवर मान्सूनच्या आगमनास विलंब झाला असून पावसाची सुरुवात अनियमित झाली. त्यामुळे सोयाबीनची पेरणी सर्वत्र एकाच वेळी न होता टप्प्याटप्प्याने झाली. तसेच अनेक भागांमध्ये आतापर्यंत झालेला पाऊस सरासरीपेक्षा कमी असल्याने सोयाबीनची अपेक्षित वाढ होताना दिसून येत नाही. अशा परिस्थितीत जमिनीतील अपुऱ्या आर्द्रतेमुळे व प्रतिकूल वातावरणामुळे सोयाबीनच्या मुळांद्वारे आवश्यक अन्नद्रव्यांचे, विशेषतः लोह (फेरस) या सूक्ष्म अन्नद्रव्याचे शोषण व्यवस्थित होत नाही. परिणामी, सोयाबीनच्या सुरुवातीच्या वाढीच्या अवस्थेत पाने पिवळी किंवा पांढरट पडणे (क्लोरोसिस) ही लक्षणे मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत.

क्लोरोसिस म्हणजे काय?

लोह (फेरस) या सूक्ष्म अन्नद्रव्याचे झाडाकडून पुरेसे शोषण न झाल्यास सोयाबीनमध्ये क्लोरोसिस ही शारीरिक विकृती दिसून येते. ही समस्या केवळ जमिनीत लोहाचे प्रमाण कमी असल्यामुळे उद्भवत नाही, तर जमिनीत लोह उपलब्ध असूनही ते झाडांना शोषून घेता न आल्यामुळे निर्माण होते.



लक्षणे : लोह (फेरस) या सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता सर्वप्रथम कोवळ्या पानांवर दिसून येते. पानांच्या शिरा हिरव्या राहतात, तर शिरांमधील भाग पिवळा पडतो. सुरुवातीची त्रिदलीय (ट्रायफोलिएट) पाने काही काळ हिरवी राहतात, तर नवीन पानांवर लक्षणे स्पष्ट दिसतात. हरितद्रव्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे प्रकाशसंश्लेषणाची क्रिया मंदावते. झाडांची वाढ खुंटते व उत्पादनात घट येते.

कारणे : चुनखडीयुक्त व कमी निचऱ्याच्या जमिनीत ही समस्या अधिक प्रमाणात आढळते. जमिनीचा सामू (पीएच) ७.५ पेक्षा जास्त असल्यास लोह पिकांना उपलब्ध स्वरूपात राहत नाही. ते फेरिक स्वरूपात रूपांतरित झाल्यामुळे पिकांना शोषून घेता येत नाही. जमिनीत जास्त ओलावा किंवा मुळांना ऑक्सिजनचा कमी पुरवठा झाल्यास लोहाचे शोषण कमी होते. पावसाची उघडीप, ढगाळ वातावरण व प्रतिकूल मृदा परिस्थितीमुळेही लोहाचे शोषण बाधित होऊ शकते.

एकात्मिक व्यवस्थापन : पाण्याचा ताण पडल्यास तुषार सिंचनाद्वारे संरक्षित पाणी द्यावे. डीटीए चिलेटेड मिश्र सूक्ष्म अन्नद्रव्य (ग्रेड) ५० ग्रॅम किंवा ५० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकतेनुसार ८-१० दिवसांनी दुसरी फवारणी करावी. ज्या शेतात अतिरिक्त पाणी साचले असेल तेथील पाण्याचा त्वरित निचरा करून वाफसा स्थिती निर्माण करावी. वापसा आल्यानंतर व पीक ३०-३५ दिवसांचे होण्यापूर्वी एक कोळपणी करावी.

महत्त्वाच्या सूचना : सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी. त्यामुळे अन्नद्रव्यांचे शोषण अधिक प्रभावी होते. शिफारशीत मात्रेपेक्षा जास्त प्रमाणात सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करू नये. जास्त प्रमाणामुळे पानांवर करपण्याची शक्यता असते. जमिनीचा सामू (पीएच) जास्त असलेल्या शेतात नियमित सेंद्रिय खतांचा वापर केल्यास सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता सुधारण्यास मदत होते. क्लोरोसिसची सुरुवातीची लक्षणे दिसताच त्वरित उपाययोजना केल्यास प्रकाश संश्लेषण सुरळीत राहून उत्पादनातील संभाव्य घट टाळता येते.

हिरव्या मिरचीच्या सुधारित वाणांची लागवड

हिरवी मिरची हे नगदी पीक आहे. ज्याची लागवड करून शेतकरी कमी वेळेत अधिक उत्पन्न मिळवू शकतात. हिरवी मिरची हा अन्नाचा एक विशेष भाग मानला जातो. लोणचे, मसाले आणि भाजीपाला यांसारख्या देशातील जवळपास सर्व स्वयंपाकघरात वापरला जातो. हिरवी मिरची आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर मानली जाते. कारण त्यात व्हिटॅमिन ए,सी, फॉस्फरस आणि कॅल्शियमसह अनेक पोषक घटक आढळतात. हिरवी मिरचीमध्ये कॅपसीन हे रसायन असते, त्यामुळे ती मसालेदार राहते. भारतात ओडिसा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये हिरव्या मिरचीची लागवड केली जाते. हिरव्या मिरचीच्या सुधारित वाणांची लागवड करून शेतकरी अधिक उत्पन्न मिळवू शकतात.

पुसा ज्वाला हिरवी मिरची :

पुसा ज्वाला ही हिरव्या मिरचीच्या



सर्वात प्रगत जातीपैकी एक आहे. ही हिरव्या मिरचीची विविधता आहे जी कीटक आणि कीटकांना प्रतिरोधक आहे. हिरव्या मिरचीच्या या जातीची लागवड करून शेतकरी सुमारे ३४ क्विंटल प्रति एकर उत्पादन मिळवू शकतात. हिरव्या मिरचीची ही जात पेरणीनंतर सुमारे १३० ते १५० दिवसांत पिकते. मिरचीच्या या जातीचा रंग हलका हिरवा असून त्याची झाडे बटू व झुडूप आहेत.

जवाहर मिर्च-१४८ वाण :

हिरवी मिरची जवाहर मिरची-१४८ या सुधारित जातीची जून महिन्यात लागवड करणे देखील शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. या प्रकारची मिरची सर्वात जलद पिकते आणि तिची चव कमी मसालेदार असते. मिरचीच्या या जातीची प्रति हेक्टरी लागवड करून शेतकऱ्यांना ८५ ते १०० क्विंटल हिरवी मिरचीचे उत्पादन मिळू शकते. जर ते कोरडे तोडले तर हेक्टरी १८ ते २५ क्विंटल मिरचीचे उत्पादन होऊ शकते.

तेजस्वनी जाती :

हिरवी मिरचीची तेजस्वनी जाती जून महिन्यात लागवडीसाठी सर्वोत्तम मानली जाते. हिरव्या मिरचीच्या या जातीच्या शेंगा मध्यम आकाराच्या असतात आणि मिरचीची लांबी सुमारे १० सेंटीमीटरपर्यंत पोहोचते. पेरणीनंतर सुमारे ७० ते ७५ दिवसांनी शेतकरी या प्रकारच्या हिरव्या मिरचीची काढणी करू शकतात. तेजस्वनी जातीच्या हिरवी मिरचीची लागवड केल्यास शेतकऱ्यांना हेक्टरी २०० ते २५० क्विंटल उत्पादन मिळू शकते.

पंजाब लाल विविधता :

पंजाब रेड वाण ही हिरव्या मिरचीच्या सुधारित जातींपैकी एक आहे. तिच्या झाडाचा आकार लहान आहे आणि तिला गडद हिरवी पाने आहेत. या प्रकारच्या हिरव्या मिरचीचा आकारही फार मोठा नसतो. या जातीची प्रति हेक्टरी लागवड करून शेतकऱ्यांना १०० ते १२० क्विंटल हिरव्या मिरचीचे उत्पादन मिळू शकते. हिरव्या मिरचीच्या या प्रकारात तुम्हाला लाल रंगाच्या मिरच्या पाहायला मिळतात.

काशी लवकर विविधता :

काशीच्या हिरवी मिरचीच्या सुरुवातीच्या जातीपासून शेतकऱ्यांना भरघोस उत्पादन मिळते. या जातीची हिरवी मिरची एक हेक्टरमध्ये पिकवून शेतकरी ३०० ते ३५० क्विंटल उत्पादन घेऊ शकतात. या जातीचे मिरचीचे रोप सुमारे ७० ते ७५ सेमी उंच आणि लहान गाठी असतात. पेरणीनंतर सुमारे ४५ दिवसांत शेतकरी काशीच्या लवकर हिरवी मिरचीची कापणी करू शकतात.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१६९३ : संभाजीराजांच्या मृत्यूनंतर मोगलांकडे गेलेला सिंहगड नवजी बलकवडे यांनी पुन्हा स्वराज्यात आणला.
१८७४ : टंकलेखक (टाईपरायटर) पहिले व्यावसायिक टंकलेखन यंत्र (टाइपराइटर) ची विक्री सुरु झाली.
१८७९ : भारतात पोस्टकार्ड बाजारात विक्रीस उपलब्ध झाली.
१९०९ : क्रांतिकारक मदनलाल धिंग्राने भारतमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली यांची इंपिरिअल इन्स्टिट्युटच्या 'जहांगिर हाऊस'मधे इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी गोळ्या झाडून हत्या केली.
१९१९ : कै. बाबूराव ठाकूर यांच्या 'तरुण भारत' (बेळगाव) या वृत्तपत्राची सुरूवात झाली.
१९३३ : नाट्यमन्वंतर संस्थेच्या 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९३४ : मानवी शरीराचे सर्वप्रथम छायाचित्र घेण्यात अमेरिकन डॉक्टरांना यश
१९४८ : बाजारपेठेतील व्यापार्यांचे नेतृत्त्व करणार्या 'पूना मर्चंट्स चेंबर' या संस्थेची स्थापना
१९४८ : 'कायदेआझम' मुहम्मद अली जीना यांच्या हस्ते 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान' या पाकिस्तानच्या मध्यवर्ती बँकेचे उद्घाटन झाले.
१९४९ : त्रावणकोर व कोचीन ही दोन संस्थाने एकत्र करुन 'थिरुकोची' संस्थान निर्माण करण्यात आले. याचेच पुढे केरळ राज्य बनले.
१९५५ : 'स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९५५' अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया अस्तित्वात आली. याआधी ही बँक इंपिरिअल बँक या नावाने ओळखली जात होती.
१९६० : रवांडा व बुरुंडी हे देश स्वतंत्र झाले.
१९६१ : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार पुणे विद्यापीठाचे चौथे कुलगुरू झाले.
१९६२: सोमालिया व घाना हे देश स्वतंत्र झाले.
१९६४ : न. वि. गाडगीळ पुणे विद्यापीठाचे पाचवे कुलगुरू झाले.
१९६४ : भारतीय औद्योगिक विकास बँकेची स्थापना
१९७५ : भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २० सूत्री कार्यक्रमाची घोषणा केली.
१९९७ : शतकातील सर्वोत्कृष्ट वेटलिफ्टर्सच्या यादीत भारताच्या कुंजरानी देवीचा समावेश करण्यात आला.
२००२ : आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायालय स्थापना झाली.
२०१५ : डिजिटल इंडिया या प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.
२०१७ : देशांतील अर्थव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण सुधारणा म्हणून वस्तू व सेवाकर (जीएसटी) संपूर्ण भारतात लागू करण्यात आला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४६ : प्रख्यात जर्मन गणितज्ञ व तर्कशास्त्र विद्वान गाटफ्रीड विलहेल्म लाइबनिज( ) यांचा जन्मदिन.
१८८२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (मृत्यू: १ जुलै १९६२ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१८८७ : कविवर्य एकनाथ पांडुरंग रेंदाळकर (मृत्यू: ? ? १९२०)
१९१३ : वसंतराव जाईक महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री, रोजगार हमी योजनेचे जनक (मृत्यू: १८ ऑगस्ट १९७९)
१९३८ : प्रख्यात भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत परंपरेतील महान बासुरी वादक, संगीत दिग्दर्शक आणि थोर शास्त्रीय कलाकार पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचा जन्मदिन.
१९४९ : वेंकय्या नायडू केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष, भारताचे वे१३ उपराष्ट्रपती
१९६१ : कल्पना चावला भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर (मृत्यू: १ फेब्रुवारी २००३)
१९६६ : उस्ताद राशिद खान रामपूर-साहसवान घराण्याचे शास्त्रीय गायक
१९६८ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध हिंदुस्थानी संगीत परंपरेतील रामपूर-साहसवान घराण्यातील शास्त्रीय संगीतकार उस्ताद रशीद खान यांचा जन्मदिन.
१९७३ : साली प्रसिद्ध भारतीय राजकारणी व समाजवादी पक्षाचे अध्यक्ष तसचं, उत्तरप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री अखिलेश कुमार यादव यांचा जन्मदिन.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६० : चार्ल्स गुडईयर रबरावरील व्हल्कनायझेशन ही प्रक्रिया शोधणारे अमेरिकन संशोधक (जन्म: २९ डिसेंबर १८००)
१९३८ : गणेश श्रीकृष्ण तथा 'दादासाहेब' खापर्डे प्रख्यात कायदेपंडित, विद्वान आणि राजकीय नेते, लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, 'वर्हाडचे नबाब' (जन्म: २७ ऑगस्ट १८५४)
१९४१ : सर सी. वाय. चिंतामणी स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रागतिक पक्षाचे नेते व श्रेष्ठ वृत्तपत्रकार, पहिल्या गोलमेज परिषदेचे विशेष अतिथी, उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री (जन्म: १० एप्रिल १८८० विजयनगरम, आंध्र प्रदेश)
१९६२ : पुरुषोत्तम दास टंडन स्वातंत्र्यसेनानी, भारतरत्न (१९६१), राष्ट्रभाषा हिन्दीचे समर्थक, अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष (जन्म: १ ऑगस्ट १८८२)
१९६२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (जन्म: १ जुलै १८८२ पाटणा, बिहार)
१९६९ : मुरलीधरबुवा निजामपूरकर कीर्तनकार
१९७१ : सर विल्यम लॉरेन्स ब्रॅग (ऑस्ट्रेलियन-ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता,)
१९८९ : प्राचार्य ग. ह. पाटील कवी व शिक्षणतज्ञ, 'माझ्या मामाची रंगीत गाडी हो', 'देवा तुझे किती, सुंदर आकाश', 'डराव डराव, डराव डराव, का ओरडता उगाच राव' अशी त्यांची अनेक बालगीते लोकप्रिय आहेत. (जन्म:)
१९९४ : राजाभाऊ नातू दिग्दर्शक, नेपथ्यकार, प्रकाशयोजक व नाट्य संघटक (जन्म:)
१९९९ : एम अँड एम चे संस्थापक फॉरेस्ट मार्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १९०४)

कर्जमाफीबाबत विचारणा करणाऱ्या ९ शेतकऱ्यावर गुन्हे दाखल, बँक ऑफ महाराष्ट्राच्या मॅनेजरची हुकुमशाही

जालना । प्रतिनिधी

मयत वडीलांच्या नावावर असलेल्या व कर्जमाफी बाबत विचारणा करण्यासाठी आष्टी येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत गेलेल्या शेतकऱ्याशी मगृरी करीत अरेरावीची भाषा करणाऱ्या शाखाधिकाऱ्यास शेतकऱ्यांनी शाखेत जाऊन जाब विचारल्यामुळे शाखाधिकाऱ्याने दिलेल्या फिर्यादीवरून आष्टी पो-लीस ठाण्यात ९ शेतकरी सामाजिक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत. तर जातिवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी शाखाधिकाऱ्यावरही ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत सर्व बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा अधिकारी हुकूमशाही सारखे वागत आहे यावरून दिसून येत आहे. आष्टी महाराष्ट्र शाखा बँकेचे मॅनेजरची बदली महाराष्ट्राच्या बाहेर करण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे. बँक ऑफ महाराष्ट्र आणि बँक मॅनेजर ला मराठी बोलता येत नाही असे शेतकऱ्याकडून

शाखाधिकाऱ्यावरही ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

सांगण्यात येत आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, आसनगाव येथील शेतकरी बळीराम नारायण खरात हे मंगळावरी (ता. २८) आष्टी येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत गेले होते. त्यांनी शाखाधिकारी हितेश दामोर यांना माझ्या वडीलांच्या नावावर असलेले पिक कर्ज माफीत बसले आहे का, असे विचारले असता श्री. दामोर यांनी वडीलांना घेऊन या असे सांगितले. यावर शेतकऱ्याने वडील मयत झाले आहेत असे सांगितले असता दोमोर यांनी मगृरी करत उप्पर से तेरे बाप को लेके आ असे हिंदीत बोलत शेतकऱ्याशी मगृरी करीत बँकेच्या बाहेर जा असे सांगितले. यामुळे सदरील शेतकऱ्याने हा प्रकार भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष

काही शेतकरी सामाजिक कार्यकर्त्यासह बँकेत जात शाखाधिकाऱ्याला विचारना केली असता मगृर असलेल्या शाखाधिकाऱ्याने आपला तोरा कायम ठेवत शेतकरी सामाजिक कार्यकर्त्याशी अरेरावीची भाषा केली. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी शाखाधिकाऱ्यास चांगलाच प्रसाद दिला.

याप्रकरणी शाखाधिकरी हितेश दामोर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन आष्टी पोलीस ठाण्यात तुकाराम सोळंके, शिवशक्ती आढाव, असेफ कच्छी, रवी लोंढे, मुजिबराज शेख, रमेश थोरात, रामेश्वर खुळे, भाऊ खरात, सचिन घुगे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात

आला आहे तर शाखेत कर्जाबाबत विचारणा करत असतांना शाखाधिकरी श्री. दामोर यांनी रवि लोंढे यांना जातिवाचक शिवीगाळ केल्याची फिर्यादी रवि लोंढे यांनी दिल्याने शाखाधिकाऱ्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र शाखाधिकार्याला मराठी बोलता येईना म्हणून शेतकऱ्याला काही समजना यासंदर्भात अशा बँक मॅनेजरची बदली महाराष्ट्र बाहेर करणे गरजेचे आहे अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कारभारावर लोक वैतागले

दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांचा मनमानी कारभार सुरु आहे. येथील शाखाधिकरी श्री. दामोर यांना मराठी येत नाही ईतर कर्मचारी ही ग्राहकांना सौजन्याची वागणूक देत नाहीत अशा तक्रारी नेहमीच होत असतात. गाव खेड्यातील शेतकरी सर्वसामान्य लोकांची कामे होत नाहीत. त्यामुळे बँक ऑफ महाराष्ट्र आणी अधिकारी गुजराती, अशी चर्चा जोरदार सुरु असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेणे गरजेचे आहे.

पराक्रम दिनानिमित्त राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन

परभणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या वतीने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी दि. १८ ऑगस्ट हा दिवस राज्यभर पराक्रम दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या शौर्याचा, पराक्रमाचा व राष्ट्रनिष्ठेचा परिचय नवीन पिढीला व्हावा या उद्देशाने राज्यभर दि.१ ते १५ ऑगस्ट या कालावधीत विविध राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

पराक्रम दिन साजरा करण्यासंदर्भात अमृत संस्थेमार्फत पराक्रम दिन समिती स्थापन करण्यात आलेली असून त्या समितीमध्ये काकासाहेब विधाते, पांडुरंग बलकवडे, जगन्नाथ लडकत, मोहन शेटे, मंगेश खाडिलकर, कौमुदी परांजपे या दिग्गज इतिहासतज्ज्ञ व अभ्यासकांचा समावेश आहे. या पराक्रम दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये व खुल्या गटातील नागरिकांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून जास्तीत जास्त नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

पराक्रम दिन स्पर्धांचे गट व स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

निबंध स्पर्धा : शालेय गट, महाविद्यालयीन गट व खुला गट. निबंधाची शब्दमर्यादा जास्तीत जास्त १००० शब्द असून मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत टाईप करून त्याची पीडीएफ फाईल अपलोड करावी. निबंधासाठी लागणारे संदर्भ अमृत पराक्रम दिनच्या संकेतस्थळावरील लिंक्स, संदर्भ पुस्तके व माहिती पुस्तिकेवरच आधारित असावेत. बक्षीसपात्र निबंधांबाबत परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

वक्तृत्व स्पर्धा शालेय गट, महाविद्यालयीन गट व खुला गट. स्पर्धकाने स्वभाषणातील जास्तीत जास्त ७ मिनिटांचा व्हिडिओ सादर करणे अपेक्षित आहे. व्हिडिओ स्वत:चा, ओरिजिनल, स्पष्ट व ठळक आवाजातील असावा. व्हिडिओमध्ये कोणतेही व्हिज्युअल इफेक्ट्स, साऊंड इफेक्ट्स किंवा एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) जनरेटेड इमेजेस वापरू नयेत. उत्तम गुणवत्तेचा व्हिडिओ तयार करून अमृत पराक्रम दिनच्या वेबसाईटवर अपलोड करावा. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

रिल्स स्पर्धा महाविद्यालयीन गट व खुला गट. प्रवेशिका सादर करण्याचा कालावधी १५ ऑगस्ट असून स्पर्धांचे स्वरूप, विषय, बक्षिसे व अधिकृत नियमावली पराक्रम दिनच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सर्व शाळा, महाविद्यालये तसेच इच्छुकांनी या उपक्रमात उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

पोलिसांवरील दगडफेक भाजपच्याच गुंडांनी केली

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलनात जखमी झालेल्या दिल्ली पोलिस आणि सुरक्षा दलांच्या कुटुंबीयांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी सांगितले की पोलिसांवर देखील दगडफेक झाली. अभिजीत दिपके म्हणाले, जे एक महिन्यापासून तिथे आंदोलन करणारे सीजेपीचे विद्यार्थी आंदोलनकर्ते होते, त्यांनी हिंसा केलेली नाही. ज्यांनी कोणी मारामारी केली ते भाजपचे गुंड होते. पोलिसांसोबत जे झाले ते वाईटच झाले आहे.



पण बघायला गेले तर दगड कोणी आणून ठेवले होते? दगडांनी भरलेला ट्रक कसा आला? हे सगळे काही भाजपच्या लोकांनी केले आहे आणि त्यांनीच पोलिसांवर दगडफेक केली आहे. आम्ही कोणत्याच हिंसेचे समर्थन करत नाही. ज्यांनी दगडफेक केली त्यांच्यावर कारवाई करू शकता, पण ज्या विद्यार्थ्यांनी काहीच केले नाही त्यांना का त्रास दिला जात आहे? असा सवाल दिपके यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, विद्यार्थ्यांवर पॅलेट गन चालवण्यात आली, बिहारमध्ये एके-४७ चालवण्यात आली. पोलिस यासाठी पोलिस भरतीमध्ये जातात का? ज्या लोकांनी दगडफेक केली त्यांना अटक करा. भाजपच्या गुंडांनी येऊन १५ दिवसांपूर्वी निशू नावाची मुलगी आहे. तिच्या वडिलांचे डोके फोडले, याच पोलिसांनी त्यांना अटक केली नाही. जेव्हा मी त्यांना विचारले की त्यांना अटक का करत नाही, त्यावर त्यांनी सांगितले की आम्ही असेच कोणालाही अटक करू शकत नाही, त्यानंतर या गुंडांनी व्हीडीओ बनवला, अभी तो एक को मारा हैं, शाम को आऊंगा तो और मारुंगा, असे त्यांनी त्यात म्हटले होते. तेव्हा पोलिस गप्प होते. कोणाच्या इशा-यावर पोलिस तेव्हा शांत होती? असा संतप्त सवाल दिपके यांनी केला आहे.

विद्यार्थ्यांचे डोक्यात लाठ्या घालताना लाजा नाही वाटल्या? खिळे लावले होते त्या लाठ्यांना तेव्हा तुम्हाला लाजा नाही वाटल्या, १२-१२ वर्षांच्या मुलींचे कपडे फाडले, त्यांच्या डोक्यात लाठ्या घातल्या पोलिसांनी. पुरुष पोलिसांनी मुलींचे कपडे फाडून मारले, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला आहे.

२०२५-२०२६ चा पिक विमा दिला नाही तर १५ ऑगस्टला झेंडा फडकवू देणार नाही -प्रा.सुशीलाताई मोराळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस साहेबांनी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांनीच जाहीर केलेला १७,५००/- रुपये पिक विमा देतो म्हणून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. आम्ही तेव्हाही हे लबाडच अवतान आहे जेवल्याशिवाय खरं नाही असं जाहीर म्हटलं होतं, आसमानी आणि सुलतानी संकटात शेतकरी सापडला आहे. ३००० रुपये प्रति क्विंटल शेतकऱ्यांना शासनाच्या खरेदी केंद्रा अभावी सोयाबीन विकावे लागले ६००० रुपये एकरी काढणीची मजुरी द्यावी लागली सरकारने विमा एक रुपया भरून घेतला असला तरी शेतकऱ्याचा प्रीमियम सरकारने भरला असला तरीही हे पैसे आम्ही जी जीएसटी



भरतो त्याच रकमेतून विमा सरकार भरतय, आमच्यावर उपकार केले नाहीत जाहीर केल्याप्रमाणे पिक विमा तात्काळ म्हणजे १५ ऑगस्ट पूर्वी खात्यावर जमा करा अशी मागणी जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती नामदार सुनेत्राताई पवार यांना निवेदन देऊन किसान संघर्ष समिती, स्वाभिमानी शेतकरी संघटना, भीमशक्ती शिवशक्ती विचार मंच, शेतकरी हक्क मोर्चा, शिवराय फुले शाहू आंबेडकरवादी आघाडी, जनहित अभियान सह समविचारी संघटनांच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली आहे. १)शेतकरी बी-बियाणे, खते, औषधे खरेदी करतो १ लाखाचा माल खरेदी केला तर १८०००/- रुपये जीएसटी देतो ही जीएसटी माफ करा. २) काही शेतकरी प्रामाणिकपणे कर्जफेड करतात सरकारने कर्जमाफ केले परंतु ज्यांनी भरले त्यांना ५० हजार रुपये, प्रोत्साहन अनुदान मिळते म्हणजे जो कर्ज भरत नाही त्याला २ लाख माफ आणि जो भरतो त्याला फक्त ५० हजार रुपये त्याऐवजी भरणारालाही किमान १ लाख रुपये प्रोत्साहन अनुदान द्यावे. ३) रात्री ऐवजी शेतात पाणी द्यायला शेतकरी जातो डुक्कर, बिबट्या, साप इत्यादी हिंस्र श्वापदामुळे अनेकांना प्राण गमवावे लागतात त्यासाठी पूर्ण क्षमतेने दिवसा १२ तास वीज मोफत द्या. ४) २ लाख कर्जमाफीची थाटात घोषणा केली मात्र आता देण्याची वेळ आली तर सरकारने भाषा बदलली आहे सरसकट अटी शर्ती न घालता कर्जमाफी द्या. ५) जून जुलै थोडा पाऊस पडला शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या पण पिके उगवली नाहीत जी उगवली ती जळून गेली, दुबार पेरणीसाठी १० हजार रुपये एकरी अनुदान द्या. या व इतर मागण्यांसाठी सरकारने गांभीर्याने विचार करावा नसता हजारो शेतकऱ्यांचा १५ ऑगस्ट ला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आम्ही आणून मंत्र्यांना झेंडावंदन करू देणार नाही. सरकारला १५ दिवसाचा वेळ आम्ही दिला आहे. असे प्रसिद्धीपत्रक प्रा. सुशीला ताई मोराळे, दिलीप भिसे, प्रकाश भन्साळी, राजेंद्र आमटे, बाळासाहेब मोरे, राजू गायके, अशोक गीते, दिनकर रिंगणे, शहादेव हिंदोळे, भीमराव कुटे, सुहास जायभाये, राजेंद्र दराडे, देविदास चव्हाण, बबनराव आंधळे, तुकाराम बारगजे, रमेश जाधव यांनी दिले आहे.

राज्यात पर्यावरण युक्त सण, उत्सव साजरे करण्यासाठी आगामी काळात महत्वाचा ॲक्शन प्लॅन आखला जाईल

बीड । प्रतिनिधी

पुढील काळात राज्यात पर्यावरण युक्त आणि प्रदुषणमुक्त सण, उत्सव साजरे व्हावेत यासाठी आमचा प्रयत्न आहे यासाठी महत्वाचा क्शन प्लॅन आखून ठोस कृती केली जाईल अशी माहिती राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत दिली.पर्यावरण पूरक सण, उत्सव साजरे करणे आणि पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यासंदर्भात पर्यावरण विभागाची एक बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या.



ना. पंकजाताई मुंडे पुढे म्हणाल्या, पर्यावरण पूरक सण, महोत्सव साजरे करण्याबाबत 'मन की बात' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले होते, त्या अनुषंगाने आमचा विभाग ठोस पावले उचलत आहे. जैविक दृष्ट्या विघटनशील मूर्ती व तांत्रिक विसर्जन प्रक्रिया यावर एक महत्वाचा क्शन प्लॅन आम्ही तयार करत आहोत. पाच वर्षे, दहा वर्षे असे वेगवेगळे टप्पे करून आगामी काळात हळूहळू पर्यावरणपूरक व प्रदूषण मुक्त मूर्ती व सण साजरे होतील यासाठी प्रयत्न केले जातील. मागील वर्षीचा गणेशोत्सव पर्यावरण विभागाने खूप सुंदर पध्दतीने नगरविकास विभागामार्फत हाताळला होता असे त्या म्हणाल्या. ना. पंकजाताईंचा कामाचा धडाका ; एकाच वेळी दोन बैठका केल्या अटेंड

एकीकडे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे आज बीडला आल्या होत्या, आणि दुसरीकडे आजच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण विभागाची बैठकही होती. स्व जिल्हयाची आणि स्व खात्याची अशा दोन्ही बैठकांच्या वेळा एकच आल्या आणि दोन्ही बैठका महत्वाच्या होत्या, अशा परिस्थितीतही त्यांनी मार्ग काढला, नियोजन समितीची बैठक अटेंड करत बाहेर गॅलरीत येऊन मुख्यमंत्र्यांची बैठकही त्यांनी ऑनलाईन अटेंड करत समन्वय साधला, त्यांची ही कृती वाखाणण्याजोगी होती.

'डीपीसी' च्या बैठकीत खा.बजरंग सोनवणेंनी जिल्ह्यातील प्रश्नांकडे वेधले पालकमंत्र्यांचे लक्ष

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्हा नियोजन समितीची बैठक उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील शेतकरी, कायदा व सुव्यवस्था, विकासकामांचा निधी आणि प्रशासकीय अनास्थेवरून आक्रमक भूमिका घेत विविध महत्त्वाच्या मागण्यांचा धडाका लावला. त्यात प्रामुख्याने, पीक विमा भरण्यासाठीची शेवटची तारीख दि.३१ जुलै रोजी संपलीअसून शेतकऱ्यांची होणारी अडचण विचारात घेता पीक विमा भरण्यासाठी तात्काळ एक महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी, ही अत्यंत महत्त्वाची मागणी खा.सोनवणे यांनी लावून धरली.

नियोजन समितीच्या बैठकीस पर्यावरण व हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, सतीश चव्हाण, प्रकाश सोळंके, धनंजय मुंडे, संदीप क्षिरसागर, सतीश चव्हाण, विजयसिंह पंडीत, सुरेश धस, विक्रम काळे, नमिता मुंदडा, बसवराज पाटील, सचिव डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, जिल्हा नियोजन अधिकारी शीला मिसाळ आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील विविध समस्यांवर प्रकाश टाकताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, शेतकऱ्यांना सध्या मिळणाऱ्या ३ लाख रुपये पीक कर्जाची मर्यादा वाढवून ती ७ लाखांपर्यंत करण्यात यावी. तसेच मागील वर्षाचा रखडलेला पीक विमा बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही; पालकमंत्र्यांनी स्वत: यामध्ये लक्ष घालून हा विषय तात्काळ मार्गी लावावा. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकरी, रस्ते आणि पायाभूत सुविधांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्या नुकसानासाठी मंजूर निधी जिल्ह्यात आणण्यासाठी शासनाने तातडीने पाठपुरावा करावा. जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी कंत्राटदारांनी कामाचे पैसे उचलूनही कामे अपूर्ण ठेवली आहेत. अशा दोषींवर आणि भ्रष्ट यंत्रणेवर कडक कारवाई करण्यात यावी. नागरी व मूलभूत सुविधांच्या कामांसाठी जिल्ह्याचा निधी वाढवून द्यावा. तसेच नगरपरिषद आणि नगरपंचायतींना तिथल्या लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी निधी वितरीत केला जावा. तलाठी, ग्रामसेवक आणि महावितरणचे लाईनमन हे मुख्यालयी किंवा आपापल्या गावांत राहत नसल्याने ग्रामस्थांची मोठी अडचण होत आहे. त्यांनी गावातच राहणे अनिवार्य करण्यात यावे. घरकूल योजनेचे हप्ते वेळेवर जमा होण्यासाठी आणि ते मंजूर करून घेण्यासाठी लाभार्थ्यांकडून पैसे उकळले जात असल्याच्या तक्रारी असून या गंभीर प्रकाराकडे लक्ष देऊन पारदर्शकता आणावी.

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह सर्वांनी सहकार्य केले-आ.बसवराज पाटील

बीड । प्रतिनिधी

माझ्या विधान परिषद निवडणुकीतील विजयात बीड जिल्ह्याचा सिंहाचा वाटा आहे. बीडकरांनी दिलेले प्रेम मी कधीही विसरणार नाही. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह महायुतीच्या सर्व आमदार, नेत्यांनी मला सहकार्य केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्याच्या विकासात भरीव योगदान देण्यासाठी कटिबद्ध असून स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देणार आहे, अशी ग्वाही भाजपचे नवनिर्वाचित विधान परिषद आमदार बसवराज पाटील यांनी दिली.

बीड-धाराशिव-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून आलेले आमदार बसवराज पाटील यांचा शुक्रवारी (दि.३१) सौ. के.एस.के. महाविद्यालयात भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते तसेच बीड नगरपरिषदेतील भाजपच्या नगरसेवकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, ज्येष्ठ नेते रामराम गिते, दिलीप भालेराव, बीड नगरपरिषदेचे भाजपचे नगरसेवक शुभम धूत,



ड.नागेश तांबारे, सय्यद मुस्तफा, सनी माने, राहुल गुरखुदे, नंदकिशोर पिंगळे, नितीन साखरे, गोविंद शिराळे, मंगेश धोंगडे, बाळासाहेब गुजर, मुन्ना गायकवाड, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, सुशांत खवतड, शुभम कातांगळे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार बसवराज पाटील म्हणाले, डॉ.योगेश क्षीरसागर हे वयाने लहान असले तरी त्यांचे राजकीय ज्ञान मोठे असून त्यांना उज्वल राजकीय भविष्य आहे. ही आपली सातवी निवडणूक आहे. प्रदीर्घ राजकीय प्रवासात अनेक निवडणुका लढवल्या; मात्र यावेळी बीड जिल्ह्यातून मिळालेले प्रेम आणि पाठबळ अविस्मरणीय आहे. बीड जिल्ह्यातील पाठबळामुळे मी रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी झालो. लातूर महानगरपालिकेनंतर बीड नगरपरिषद ही महत्त्वाची स्थानिक स्वराज्य संस्था असून विशेष लक्ष दिले जाईल. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक त्या सर्व पातळ्यांवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी आपण कायम कटिबद्ध राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

बीड न.प.मधील परिस्थिती पुन्हा सुस्थितीत आणण्यासाठी प्रयत्न-डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, विजयानंतर आपण पहिल्यांदाच बीडमध्ये आलात. पुढील भेटीत आपल्या मार्गदर्शनाखाली बीड नगरपरिषदेची आढावा बैठक घेण्याची आमची इच्छा आहे. आपल्या मतदारसंघात आपण स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रभावी व्यवस्थापन केले आहे. त्याचा अनुभव बीडलाही लाभावा. बीडमधील बदललेली परिस्थिती पुन्हा सुस्थितीत आणण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू असून येत्या एक-दोन महिन्यात त्याला निश्चित दिशा मिळेल. त्यानंतरही आपले मार्गदर्शन, सहकार्य आणि आशीर्वाद कायम लाभावेत, असे डॉ.क्षीरसागर यांनी म्हटले.

सेलू तालुक्यात रिमझिम पावसामुळे शेतकरी सुखावला

सेलू । प्रतिनिधी

मागील जवळपास १५ दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने आज गुरूवार, दि. ३० जुलै रोजी सकाळपासूनच रिमझिम पावसाला सुरुवात केली. सेलू शहर आणि ग्रामीण भागासह तालुक्यात सर्वदूर पाऊस हा पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतकरी सुखावला असून शेतकामांना वेग आला असल्याने शेतक-यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

मागील दोन ते तीन आठवड्यापासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतातूर झाला होता. सुरूवातीच्या पावसावर पेरलेली बियाणे कोमेजून जाण्याच्या परिस्थितीत असताना गुरुवारी पहाटे पासूनच रिमझिम पावसाने सुरुवात केली. सेलू शहरासह ग्रामीण भागातही हा पाऊस कोसळत आहे. त्यामुळे पेरलेल्या पिकांना जीवदान मिळणार असून शेतकामांना वेग आलेला आहे. यापुढे किमान दोन दिवस असाच पाऊस कोसळत राहणार असल्याचा अंदाज असल्यामुळे शेतक-यांच्या अशा पल्लवीत झालेल्या आहेत.

जून महिन्यापासून पेरण्या केलेल्या पिकांना पावसाची नितांत आवश्यकता होती. मध्यतरी पावसाने दडी मारल्याने पेरलेले बियाणे कोमेजून जाण्याच्या परिस्थितीत असताना आजपासून सुरू झालेल्या रिमझिम पावसामुळे जिवदान मिळाले आहे. मागील २४ तासात सेलू शहरात केवळ ७ मि. मी. पावसाची नोंद झाली असून आजपर्यंत १०१.५ मि. मी. पाऊस झालेला आहे. आजचा पाऊस तालुक्यात सर्व दूर सुरू आहे. हा पाऊस असाच सुरू राहील्यास धरणांतील पाणीसाठ्यातही वाढ होण्यास मदत होणार आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.३१ जुलै २०२६ | ६

रात्री अकरापर्यंत बैठका... सकाळी सातला रुग्णालयात हजेरी

बीड । प्रतिनिधी

घड्याळाच्या काट्यांनी रात्री अकरा वाजल्याचे सांगितले, तरी गुरुवारी बैठका सुरूच होत्या. प्रशासनाशी विकासकामांचा आढावा, लोकप्रतिनिधींसोबत चर्चा, नागरिकांच्या अडचणी... आणि अवघ्या काही तासांच्या विश्रांतीनंतर शुक्रवारी सकाळी नेमके सात वाजता उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात दाखल झाल्या. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या 'क्शन मोड'ने त्यांनी खऱ्या अर्थाने बीडचे पालकत्व स्वीकारण्याची भावना बीड करांच्या मनात दाटून आली आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतःहून बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारले होते. त्यानंतर ज्या झपाट्याने त्यांनी विकासकामांना गती दिली, मोठ्या निधीला मंजुरी मिळवून



सुनेत्रा पवारांच्या 'ॲक्शन मोड'ने बीडला दिला नवा विश्वास

दिली आणि प्रशासनाला कामाला लावले, त्यामुळे बीडकरांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. त्यांच्या अकाली निधनानंतर हा विकासाचा वेग कायम राहील का, सुरू असलेल्या कामांचे काय होईल, अशी चिंता अनेकांच्या मनात होती.

मात्र सुनेत्रा अजित पवार यांच्या दोन दिवसांच्या दौऱ्याने त्या चर्चांना नवी दिशा मिळाली आहे. गुरुवारी सलग बैठका घेऊन रात्री जवळपास अकरा वाजेपर्यंत विकासकामांचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी नागरिकांच्या अडचणीही ऐकून घेतल्या. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पहाटे सात वाजता जिल्हा रुग्णालयात पोहोचून आरोग्य सेवांची पाहणी, सुरू असलेल्या कामांचा आढावा आणि अधिकाऱ्यांना दिलेल्या स्पष्ट सूचनांतून त्यांनी कामालाच सर्वोच्च प्राधान्य असल्याचा संदेश दिला.

या दौऱ्यामुळे जिल्ह्यात अशी भावना व्यक्त होत आहे की, बीडच्या विकासाचा धागा तुटू दिला जाणार नाही. सुनेत्रा पवार यांनी केवळ पालकमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारलेली नाही, तर ती कृतीशील आणि परिणामकारक पद्धतीने पार पाडण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या कामाच्या झपाट्यामुळे बीडकरांच्या अपेक्षांना पुन्हा नवी पालवी फुटल्याचे बोलले जात आहे.अजित पवार यांनी दाखवून दिलेल्या विकासाच्या वाटेवर आता सुनेत्रा पवार त्याच तळमळीने पुढे जात असल्याचे चित्र या दोन दिवसांच्या दौऱ्यातून स्पष्टपणे समोर आले. त्यामुळे बीडच्या विकासाला पुन्हा वेग मिळेल, अशी आशा जिल्ह्यात अधिक दृढ होताना दिसत आहे.

आष्टीत आ.सुरेश धस यांच्या कल्पनेतील मुख्यमंत्री मोफत 'महाआरोग्य शिबिर'



महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा– माऊली अप्पा जरांगे

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे लाडके नेते तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि जिल्हा प्रशासन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी येथे 'मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे.

मराठवाडा भूषण लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या प्रमुख उपस्थितीत हे भव्य शिबिर पार पडणार आहे.

शिबिरदिनांक व वेळ: गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६, वेळ: सकाळी १०:०० ते दुपारी ५:०० पर्यंत.अनिषा ग्लोबल स्कूल ग्राउंड, जामगाव रोड, आष्टी, जि. बीड.शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून रोग निदान: नामांकित व तज्ज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांचे योग्य निदान व मार्गदर्शन.मोफत रक्त व लघवी चाचणी आणि ई.सी.जी. तपासणी: आवश्यक वैद्यकीय चाचण्या जागेवरच पूर्णपणे मोफत केल्या जातील.मोफत चष्मे व काठचा वाटप: गरजू व्यक्तींसाठी मोफत चष्मे आणि काठ्यांचे वाटप केले जाईल. शिबिरात मोफत आयुष्मान भारत कार्ड काढून दिले जाईल.मोफत रुग्ण शस्त्रक्रिया: शिबिरानंतर ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असेल, त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया केली जाईल.शिबिराचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या सर्व रुग्णांनी सोबत रशनकार्ड, आधारकार्ड मूळ प्रत व झेरॉक्स प्रत आवर्जून आणावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.जास्तीत जास्त नागरिकांनी या मोफत महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिप सदस्य माऊली अप्पा जरांगे यांनी केले आहे

गेवराईतील कथित गृह-अतिक्रमण व धमकी प्रकरणात माऊली भवर यांना सत्र न्यायालयाकडून नियमित जामीन मंजूर

गेवराई । प्रतिनिधी

पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा नोंद क्रमांक ०३५९/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३३३, ३५२, ३५१(२), ३५१(३), ६१(२) आणि ३(५) अन्वये अटकेत असलेले आरोपी क्रमांक ३ माऊली भवर यांना बीड येथील सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १२ जून २०२६ रोजी रात्री गेवराई तालुक्यातील नागझरी फाटा येथे आरोपींनी बेकायदेशीरपणे घरात घुसून मारहाण केली व वाळू तक्रारीवरून जीवे मारण्याची धमकी दिली असा आरोप केला होता. या प्रकरणात पोलीस प्रशासनाने माऊली भवर यांना २५ जून २०२६ रोजी ताब्यात घेऊन न्यायालयीन कोठडीत पाठवले होते.बचाव पक्षाच्या वतीने



ॲड. उत्कर्ष भगवानराव सोनवणे यांनी न्यायालयात बाजू मांडताना अत्यंत प्रभावी आणि वस्तुनिष्ठ युक्तिवाद केला, त्यांना ड. अजय हुंबे यांनी सहकार्य केले. केवळ जुने गुन्हे प्रलंबित आहेत म्हणून नवीन प्रकरणात जामीन नाकारता येत नाही, तर चालू गुन्ह्यातील प्रत्यक्ष भूमिका पाहणे महत्त्वाचे असते हा कायदा न्यायालयात पटवून दिला. २५/०६/२०२६ पासून आरोपी सातत्याने कोठडीत असून तपास अंतिम टप्यात आला आहे, त्यामुळे आरोपीला अधिक काळ तुरुंगात ठेवणे म्हणजे खटल्यापूर्वीची शिक्षा दिल्यासारखे ठरेल, असा युक्तिवाद करण्यात आला. बचाव पक्षाच्या वकिलांचा हा घटनात्मक व कायदेशीर युक्तिवाद ग्राह्य धरून माऊली भवर यांची सशर्त जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश न्यायाधीशांनी दिले.

माजी आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर व भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

आनंद चॅरिटेबल संस्था,शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ व भगिनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार लोकनेते भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर व भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा येथील भव्य क्रीडांगणावर दि. ५ ते ७ ऑगस्ट २०२६ दरम्यान क्रीडा महोत्सव संपन्न होणार आहे. महोत्सवात संस्थे अंतर्गत शाळा, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार आहेत. माजी आ. भीमराव धोडे यांना लहानपणापासूनच खेळाची प्रचंड आवड आहे.ते आष्टी- पाटोदा-शिरूर मतदार संघाचे २० वर्ष आमदार राहिलेले आहेत.मतदार संघाला शैक्षणिक दृष्ट्या संपन्न करण्यात त्यांचा मोठा वाटा राहिलेला आहे. सामाजिक, राजकीय,धार्मिक, सांस्कृतिक, साहित्य आणि क्रीडा क्षेत्रामध्ये त्यांचे मोलाचे काम केले आहे. खेळामुळेच मी राजकारणात यशस्वी झालो असे माजी आ.धोंडे नेहमी सांगतात. आष्टी-पाटोदा-शिरूर तालुक्यामध्ये वंचित



सर्वसामान्य गोरगरिबांच्या मुलांसाठी शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचविली आहे. त्यांच्या समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन नवभारत मीडिया ग्रुपचा प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.दि.५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता क्रीडा महोत्सव उद्घाटन होणार आहे. त्यानंतर माय मराठी पुणे प्रस्तुत महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होईल तसेच सर्वसामान्य गोरगरिबांच्या मुलांसाठी शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचविली आहे. त्यांच्या समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन नवभारत मीडिया ग्रुपचा प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.दि.५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता क्रीडा महोत्सव उद्घाटन होणार आहे. त्यानंतर माय मराठी पुणे प्रस्तुत महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होईल तसेच रक्तदान शिबिर होणार आहे.

या क्रीडा महोत्सवामध्ये कबड्डी,खो-खो, व्हॉलीबॉल, रनिंग, रिले,उंच उडी, लांब उडी,थाळी फेक,गोळा फेक,भालाफेक मुले,मुली व दि.७ ऑगस्ट रोजी सकाळी संस्थेअंतर्गत शाळा कॉलेजचे अंतिम सामने होतील त्यानंतर १२ ते ३ निमंत्रित मल्लांच्या ४० कुस्त्यांची दंगल रंगणार आहे. आहे.वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धांचा समावेश करण्यात आला आहे. या स्पर्धांमधून सहभागी खेळाडूं मध्ये क्रीडाभावना, शिस्त,संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होण्यास मोठी मदत होणार आहे. ◀◀ पान ३ वर

दिंडीत महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या महिला जेरबंद

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील नगद नारायण महाराज नारायणगड येथील दिंडी दरम्यान गर्दीचा फायदा घेत एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लांबवणाऱ्या दोन महिला आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून, त्यांच्याकडून १ लाख १९ हजार ९९० रुपये किमतीचा सोन्याचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दिनांक १५ जुलै २०२६ रोजी



नारायणगड येथील दिंडी सोहळ्यात गर्दीचा गैरफायदा घेऊन अज्ञातांनी एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरले होते. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांची कारवाई व तपास

गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन महिला ◀◀ पान ३ वर

आ. सुरेश धस यांचा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विकासकामांसाठी प्रभावी पाठपुरावा

आष्टी । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी आष्टी मतदारसंघासह संपूर्ण बीड जिल्ह्याच्या विकासाशी निगडित विविध प्रश्नांवर प्रभावीपणे भूमिका मांडत महत्त्वाच्या मागण्या केल्या.



शेतकरी, शिक्षण, पर्यटन, ऊर्जा व पशुसंवर्धनाशी संबंधित विविध मागण्या; शासनाच्या निर्णयांचेही मानले आभार

बैठकीत दूध उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना अनुदानावर डशु डींशव डशाशप उपलब्ध करून देण्यात यावे, संत भगवान बाबा निवासी वसतिगृह पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात यावे, आदर्श शाळांमधील प्रलंबित सुविधा तातडीने पूर्ण कराव्यात, जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी इमारतींची रखडलेली कामे गतीने पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी आ. धस यांनी केली.

याशिवाय जिल्ह्यातील पर्यटन विकासाला ◀◀ पान ३ वर

बीडच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी डॉ. ज्योतीताई मेटे यांचे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन बीड शहर व तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनामध्ये नागरिकांच्या मूलभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, आरोग्य, पशुसंवर्धन तसेच पुनर्वसनाशी संबंधित सहा महत्त्वाच्या मागण्यांकडे लक्ष वेधत त्यावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.



निवेदनामध्ये बीड शहरातील बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सुभाष चौक आदी प्रमुख ठिकाणी महिलांसाठी आधुनिक व सुसज्ज सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारण्याची मागणी करण्यात आली. तसेच महिला बचत गटांना त्यांच्या उत्पादनांसाठी कायमस्वरूपी विक्रीची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी बीड पंचायत समितीच्या जुन्या आवारात अथवा 'उमेद' अभियानांतर्गत महिला बचत गटांसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ किंवा मॉल उभारण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय मौजे करचुंडी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणी-२ वरून श्रेणी-१ मध्ये रूपांतर करून परिसरातील शेतकरी व पशुपालकांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. ◀◀ पान ३ वर



मोगरा जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोगरा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाच्या शालेय गणवेशाचे वितरण दि ३१ जुलै शुक्रवार रोजी मान्यवरांच्या, शिक्षकांच्या व शिक्षणप्रेमी नागरिकांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले.

मोगरा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना नवीन गणवेश परिधान करताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह आणि आत्मविश्वासाचे भाव उमटले. या उपक्रमामुळे शाळेत नवचैतन्य निर्माण झाले असून ◀◀ पान ३ वर

पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते नुतन कार्डियाक रुग्णवाहिकेचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते आज बीड



जिल्हा रुग्णालयातील नुतन कार्डियाक रुग्णवाहिकेचे उद्घाटन करण्यात आले. बीड जिल्ह्यातील हृदयरोग रुग्णांना तात्काळ आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी ही रुग्णवाहिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. जिल्हा रुग्णालयात कार्डियाक रुग्णवाहिका आणि कॅथलॅबची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे आता जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना उपचारासाठी इतर मोठ्या शहरामध्ये धाव घेण्याची गरज भासणार नाही, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या उद्घाटन सोहळ्यानंतर पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी बीड जिल्हा रुग्णालयातील नवनिर्मित कार्डियाक कॅथलॅब युनिटची पाहणी केली. तसेच रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा आढावा घेत त्यांनी रुग्णांना दर्जेदार उपचार देण्याबाबत प्रशासनाला आवश्यक सूचना केल्या. यावेळी आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, माजी आमदार संजय दौड, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांची प्रमुख उपस्थिती होती.

जीपीएस आणि बनावट नोटरीचा फंडा उघड!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात बनावट आधार कार्डच्या आधारे नोटरी करून महिंद्रा थार गाडी विक्री केल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच जीपीएसच्या (त्रझड) साहाय्याने ती पुन्हा चोरून नेणाऱ्या एका चलाख चोरट्यांच्या टोळीचा गेवराई पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी चोरीस गेलेली महिंद्रा थार व गुन्ह्यात वापरलेली अर्टिगा कार जप्त केली असून, आरोपींचा मोठा कट उघडकीस आणला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी राज भुराजी शिंदे (रा. महात्मा फुले नगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड) यांनी पोलीस ठाणे गेवराई येथे फिर्याद दिली होती की, त्यांनी बसवराव महादेव म्हासाळकर यांच्याकडून दिनांक १५ जुलै २०२६ रोजी नोटरी करून महिंद्रा थार (नोंदणी क्र. चक१४घड५८५८) विकत घेतली होती. मात्र, ही गाडी दिनांक १९ जुलै



आंतरजिल्हा टोळीचा गेवराई पोलिसांकडून पर्दाफाश

२०२६ रोजी रात्री १ ते २ वाजेच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरासमोरून अज्ञात चोरांनी लांबवली. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सपोनि समाधान दौड करत आहेत.

तपासातील खळबळजनक उलगडा:

बनावट कागदपत्रे: आरोपींनी महिंद्रा थारचे मूळ मालक बसवराव महादेव म्हासाळकर (रा. पुणे) यांच्याकडून गाडी विक्रीसाठी आणली होती. त्यानंतर मूळ मालकाचे बनावट आधार कार्ड तयार करून त्यावर दुसऱ्याच आरोपीचा फोटो लावून तेच गाडीचे खरे मालक असल्याचे भासवले.

नोटरीद्वारे विक्रीचा बनाव: आरोपींनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे नोटरी करून ती गाडी फिर्यादीस विकल्याचा बनाव रचला.

जीपीएसचा गैरवापर: गाडीचा ताबा दिल्यानंतर अवघ्या ३ ते ४ दिवसांत वाहनात आधीपासून बसवलेल्या त्रझड ट्रॅकरच्या साहाय्याने गाडीचे लाईव्ह लोकेशन ट्रेस करण्यात आले. त्यानंतर आरोपींकडे असलेल्या दुसऱ्या चावीचा वापर करून फिर्यादीच्या ताब्यातील गाडी पुन्हा चोरी करण्यात आली.

अहिल्यानगरपर्यंत धाड आणि जप्ती:

तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे दिनांक २८ जुलै २०२६ रोजी गुन्ह्यात वापरलेली 'Ertiga' गाडी आणि एका आरोपीस ताब्यात घेतले. तसेच मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलीस पथकाने दोन वेळा अहिल्यानगर येथे धाव घेतली. तपासणीदरम्यान चोरीस गेलेली महिंद्रा थार गाडी अहिल्यानगर ◀◀ पान ३ वर

इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व एमटीएस परीक्षेत घवघवीत यश

युसुफवडगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगाव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चौथी-पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच एमटीएस ऑलिंपियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे.

चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत युसुफवडगाव केंद्रातून शाळेचे प्रियल तोडकर, अर्जुन भुमकर, शिवप्रसाद लामतुरे, सिद्धी जोशी, अमित जोशी, आरव टिंगरे, समर्थ सुरवसे, समर्थ पांढवळे आणि वरद गुजर हे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. तसेच पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेच्या १३



विद्यार्थ्यांनी यश संपादन करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.याचबरोबर शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील एमटीएस ऑलिंपियाड परीक्षेत इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलने तालुक्यात सर्वाधिक विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला आहे. या परीक्षेत अर्जुन भुमकर, प्रियल तोडकर, शांभवी थळकरी, तन्वी थळकरी, आदिती सावंत, शिवप्रसाद रोडगे, स्वरूप भुसारी, सार्थक पवार, कौस्तुभ कोरडे आणि आदिती थळकरी यांच्यासह १७ विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल, तर ५१ विद्यार्थ्यांनी सिल्व्हर मेडल प्राप्त केले. तसेच इतर अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26